# प्रकरण चार

## समाजकल्याण विभाग

**4.451 दारिद्र्य रेषेखालील अपंग लाभार्थ्यांना कुबड्या खरेदीतील अनियमिततेबाबत. (जिल्हा परिषद फंड)**

**पंचायत समिती विक्रमगड, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** पंचायत समिती विक्रमगड यांनी सन 2014-2015 या वित्तीय वर्षात प्रमाणक क्रमांक 8, दिनांक 31/03/2015 अन्वये रुपये 12,000/- खर्च नोंदवलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक झेडपीए/2005/ प्र.क्र.375/वित्त 9,दिनांक 30/12/2006, शासन निर्णय क्रमांक, झेडपीए/2012/प्र.क्र.680/वित्त व दिनांक 31/01/2013, शासन निर्णय, क्रमांक, झेडपीए/2008/प्र.क्र.444/वित्त-9, दिनांक 15/07/2008 मधील परिशिष्ट (6) व शासन निर्णय, मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/11/1999 नुसार योजना राबविताना निविदा मागणी कालावधी 7 दिवस देणे व तांत्रिक मान्यता घेऊन लाभार्थी निवड करून वेळापत्रकानुसार योजनेचा लाभ लाभार्थींना देणे जरुरीचे आहे. याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक मागास 1093/ प्र.क्र.1571/34,दिनांक 16/11/2004, परिपत्रक क्रमांक परास/1096/प्र.क्र.178,दिनांक 09/10/1997 व परिपत्रक क्रमांक परास-1093/सी.आर/1947, दिनांक 02/07/1993 नुसार वैयक्तिक स्वरुपाच्या योजना राबविताना लाभार्थी उत्पन्न रुपये 27,000/- पेक्षा कमी किंवा दारिद्र्यरेषेखालील असणे आवश्यक आहे. तसेच साहित्य खरेदी ज्या वित्तीय वर्षात केली त्याच वित्तीय वर्षात लाभ देऊन विनियोग प्रमाणपत्र घेणे असतानाही अशी कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक परास-1096/प्र.क्र.178, दिनांक 09/10/1997 मधील अट क्र. 5 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले असेल त्याच वित्तीय वर्षात लाभ देणे आवश्यक असताना साठा रजिस्टर 33 पान नं. 77 वर दिनांक 31/03/2015 पर्यंत 10 कुबड्या नग शिल्लक आहे याबाबत खुलासा करावा.

**4.452 अपंगांना पंचायत समिती सेस अंतर्गत होमलाईट.**

**पंचायत समिती पेण, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती पेण यांनी समाजकल्याण विभागांतर्गत पंचायत समिती सेस अंतर्गत 3 टक्के अपंगांना होमलाईट वाटप 50 नग दर रुपये 9,810/- प्रमाणे खरेदी केलेले आहेत. त्यासाठी एकूण रक्कम रूपये 4,90,500/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) तांत्रिक अटीप्रमाणे अपंगाना शल्य चिकित्सकांचा दाखला घेणे आवश्यक आहे व उत्पन्नाचा दाखला रूपये 60,000/- च्या आत असल्याची अट तांत्रिक मंजूरी आदेशात दिसून येते. तसेच लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील असावा हि अट आहे परंतु संबंधित प्रमाणपत्रे बिलासोबत जोडलेली दिसून आली नाही.

2) पुरवठा आदेश क्रमांक स.क.वि./वशी/574/दिनांक 20/02/2015 अन्वये एम.एस.एस. ऑपरेटेक प्रा.क्र.36 ए.प्रवाशी/एक स्टीयल/स्टेट चौक आरे रोड गोरेगांव इस्ट 63 यांना पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.परंतू सन 2014-15 चे स्टॉक रजिष्टरला माल प्राप्त झाल्याची व तो वाटप कशाप्रकारे केला याची नोंद करणेंत आलेली नाही.

3) उर्जा साहित्याचा दर्जा कालावधीचा पुरवठा झालेल्या तारखेपासून शासनाने मंजूर केलेला दर करारातील कराराप्रमाणे असेल सदर साहित्य खराब/नादुरूस्त झाल्यास उत्पादकाने सौर उर्जेचे होम लाईट बदलून / दुरूस्त करून देणेचे आहे. परंतू संबंधितांशी स्टॅम पेपरवर दर करार न करताच संबंधित पुरवठादारास रक्कम अदा केलेली आहे.

4) संच आय.एस.आय.मार्क चे असावेत अशी अट असतांना ते आय.एस.आय मार्कचे असल्याची पडताळणी केली नाही, त्यामूळे वस्तूच्या गुणवत्तेची खात्री करता आली नाही.

5) तांत्रीक मंजूरी कधी दिली याचा दिनांक व क्रमांक मंजूरी आदेशात दिसून येत नाही.

6) होमलाईट नंबर 2 कुणाकडून व काय प्रोसीजर अवलंबून खरेदी करण्यात यावे याचा उल्लेख दिसून येत नाही.

7) तांत्रीक मंजूरी अटी प्रमाणे ग्रामसभेच्या ठरावाची प्रत सोबत आढळली नाही.

8) बिलाची पहाणी करता बिलाचे किती नग? व काय दराने खरेदी केले याचा बोध होत नाही.

9) लाभार्थ्यांच्या वाटप केल्यावर स्वाक्षऱ्या घेतल्या नाही.

**4.453 मागासवर्गीय वस्तीस सौर पथदिवे वाटप करणे.**

**पंचायत समिती पेण, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 31) -** पंचायत समिती पेण यांनी पंचायत समिती सेस मधून समाज कल्याण विभागाअंतर्गत मागासवर्गीय वस्तीत 100 टक्के अनुदानावर सौर पथदिवे वाटप करणेसाठी अंदाजपत्रकिय तरतुद रूपये 1,00,000/- इतकी होती, प्रत्यक्षात खर्च रूपये 88,205/- करणेंत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सौर पथदिवे खरेदी करण्यासाठी पंचायत समिती पेण यांनी दरपत्रके मागवितांना जाहिर निविदा न मागविता पत्र क्र.पं.स.पेण/ग्रा.पं./स.क./597/14, दिनांक 21/02/2015 नुसार (1) ग्लोबल कंपनी मुंबई (2) मायक्रोनिक्स सुंदर लक्ष कॉम्पलेक्स जुन्नर पुणे व (3) डी.सी.टी.इम्पलेक्स वसई, जिल्हा ठाणे यांना पत्र देऊन नियमबाहय पुरवठा आदेश दिलेला आहे.

2) पुरवठादारांकडून सौर पथदिवे खरेदी करता पाठविलेल्या दरपत्रक नस्तीत उपलब्ध असलेल्या दरपत्रकावर दिनांक नमुद नाही. ती कोणासमोर उघडली त्यांची स्वाक्षरी नाही. त्यामूळे सदरची दरपत्रके लेखापरिक्षणात मान्य करता येत नाहीत.

3) सौर पथदिवे खरेदी करतांना शासन दरकरारानुसार खरेदी करण्यात आलेली नाही. व शासन निर्णय उदयोग व कामगार विभाग क्रमांक भाखस/1088/2512/उदयोग-6/दिनांक 02/01/1992 नुसार खरेदी कार्यपध्दतीचा अवलंब केलेला नाही.

4) सौर पथदिव हमी कालावधी किमान 2 वर्षे व पुढील देखभाल दुरूस्ती याबाबत करारनाम केलेला नाही.

5) शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र.9,दिनांक 02/06/2008 अन्वये योजना राबविण्याचे वेळापत्रक ठरवून दिले आहे, त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

6) सौरदिप पुरवठा केल्यानंतर नमूना नंबर 33 वर नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत, व तसे प्रमाणपत्र देयकावर देण्यात आलेले नाही.

7) खरेदी रक्कम रूपये 88,205/- च्या 2 टक्के आयकर व त्यावरील सेस अशी रक्कम रूपये 2029/- वसूली देयकातून केलेली नाही.

**4.454 जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग साहित्य वाटपातील अनियमितता.**

**पंचायत समिती महाड, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती महाड येथे जिल्हा परिषद सेस फंडातून झेरॉक्स मशीन बँजो साहित्य पुरवठा करणे व कॉम्प्युटर पुरविणे या योजनेत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेचा लाभ यापुर्वी घेतला नसल्याचे व साहित्य विकणार नाही व गहाण टाकणार नाही याचे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र उपलब्ध झाले नाही.

2) प्रमुख अर्जदार नितीन दिनेश पारधी यांचे सक्षम प्राधीकाऱ्याच्या सहीचा जातीचा दाखला प्रस्तावासोबत लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

3) पंचायत समिती महाड यांच्याकडील जावक क्रमांक/पं.स.म./वशी/स.क.9/919/2015, दिनांक 11/03/2015 रोजीच्या पत्रन्वये गटविकास अधीकारी महाड यांनी प्रस्तावत नमुद लाभार्थ्यांचे जातीचे दाखले व तसेच संबंधीत

लाभार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या नसल्याचे त्रृटी काढून प्रस्ताव परत केला असतांनाही संबंधीत लाभार्थ्यांच्या त्रृटीची पुर्तता न करता लाभ देण्यात आल्याचे दिसून येते.

4) समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद रायगड यांच्याकडील प्राप्त साहित्य पंचायत समिती महाड यांच्याकडून प्रमुख लाभार्थी अर्जदाराने (श्री.नितीन दिनेश पारधी) यांनी ताब्यात घेतल्याचे दिसून येत नाही.

5) एकूण 14 लाभार्थ्यांचे अर्ज पंचायत समिती महाड यांच्या दप्तरी उपलब्ध झाले नसल्याने संगणक योजनेचा लाभ देतांना अटी, शर्तीचे पालन झाले अथवा नाही. याची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

**4.455 पंचायत समिती मालवण, पंचायत समिती उपकरातून 20 टक्के समाजकल्याण राखीव निधीतून ताडपत्री खरेदीबाबत.**

**पंचायत समिती मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती मालवण ने उपकर निधीतून 20 टक्के समाजकल्याण अंतर्गत शासन दरकरार दिनांक 12/01/2015 नुसार ताडपत्री 299 नग खरेदीसाठी रुपये 4,99,599/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/ प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविताना विहित वेळापत्रकानुसार राबविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे राबविण्यात आलेली नाही.

2) सदर खरेदीसाठी प्रशासकिय मान्यता व तांत्रिक मान्यता रक्कम रुपये 5,00,000/- साठी घेतलेली आहे, परंतु प्रत्यक्ष खरेदी रुपये 6,25,179/- ची केलेली आहे.

3) ज्या शासन दर करारानुसार साहित्य खरेदी केले तो दरकरार क्रमांक पुरवठा आदेशात दिसून येत नाही.

4) लेखापरीक्षण दिनांकापर्यंत फक्त 74 लाभार्थींचे प्रस्ताव प्राप्त आहेत व लाभार्थींची यादी मंजुर केलेचे दिसून येत नाही.

5) लाभार्थी निश्चित नसताना पुरवठा आदेश कोणत्या आधारे देण्यात आला?

6) साहित्य पुरवठा आदेश देण्यापूर्वी लाभार्थी हिस्सा वसूल करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

7) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेड पी ऐ/2000/प्र.क्र.41/33, दिनांक 17/01/2001 नुसार त्याच वित्तीय वर्षात लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप करुन प्रत्यक्ष लाभ देणे आवश्यक असताना लेखापरीक्षण दिनांकापर्यंत 299 नग खरेदी पैकी फक्त 66 नग वाटप केल्याचे दिसून येते.

8) लाभार्थ्यांचे गाव निहाय मास्टर रजिस्टर ठेवण्यात आलेले नाही.

**4.456 मागासवर्गीय बेघर व्यक्तिंना नवीन घरकुलासाठी अर्थसहाय्य देणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती सावंतवाडी, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती सावंतवाडी समाजकल्याण विभाग यांनी मागासवर्गीय बेघर व्यक्तिंना नवीन घरकुलासाठी अर्थसहाय्य देणे या योजनेसाठी जिल्हा परिषद सेस निधीतून रक्कम रुपये 1,40,000/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बेघर व्यक्तिंना लाभ देणेपूर्वी सदर लाभार्थीने दुस-या शासकीय योजनेतून लाभ न घेतल्याचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

2) लाभार्थीचे घरकुल मागणी प्रस्ताव दोन प्रतीत तयार करुन एक प्रत समाजकल्याण विभागाकडे व दुसरी प्रत पंचायत समिती स्तरावर जमा करुन ठेवणे आवश्यक होते. लेखापरीक्षणासाठी लाभार्थ्यांचे प्रस्ताव तपासणीसाठी उपलब्ध झाले नाहीत.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.444/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार परिशिष्ट क्रमांक इ मध्ये दर्शविल्या प्रमाणे विशेष कालावधीत लाभार्थ्यांना लाभ देणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही न झाल्याने योजनेचा मुळ उददेश सफल झालेला नाही.

4) लाभार्थ्यांचे घरकुल पूर्ण झालेबाबत उपयोगिता प्रमाणपत्रे व कामपूर्णत्वाचे दाखले लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाले नाही.

5) घरकुलाचे अनुदान लाभार्थ्यांना हप्त्या हप्त्याने देणे आवश्यक होते. पंचायत समितीने संपूर्ण अनुदान ग्रामपंचायत स्तरावर वितरीत केले आहे.

6) घरकुलाचे काम पूर्ण झालेबाबत फोटो नाहीत.

7) योजनेचा लाभ घेतलेबाबत मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

**4.457 मागासवर्गीयांना जुने घर दुरुस्ती अनुदान योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती सावंतवाडी, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती सावंतवाडी समाजकल्याण विभागाने मागासवर्गीयांना जुने घर दुरुस्ती अर्थसहाय्य देणे या योजनेसाठी जिल्हा परिषद सेस निधीतून रक्कम रुपये 2,75,000/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ज्या लाभार्थ्यांना जुने घर दुरुस्ती योजनेचा लाभ दिला आहे, त्यांचे जुन्या घराचे फोटो व घरकुल दुरुस्ती पूर्ण झाले नंतरचे फोटो लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे योजनेच्या लाभासाठी योग्य लाभार्थ्यांची निवड झाली किंवा लाभ घेतलेल्या लाभार्थींचे जुने घर दुरुस्त झाले किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही.

2) लाभार्थींचे घरकुल मागणी प्रस्ताव दोन प्रतीत तयार करुन एक प्रत समाजकल्याण विभागाकडे व दुसरी प्रत पंचायत समिती स्तरावर जमा करुन ठेवणे आवश्यक होते. लेखापरीक्षणासाठी लाभार्थ्यांचे प्रस्ताव तपासणीसाठी उपलब्ध झाले नाहीत.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.444/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार परिशिष्ट क्रमांक इ मध्ये दर्शविल्या प्रमाणे विहीत कालावधीत लाभार्थ्यांना लाभ देणे आवश्यक आहे. मात्र तशी कार्यवाही न झाल्यामुळे योजनेचा मुळ उददेश सफल झालेला नाही.

4) लाभार्थ्यांचे घरकुल पूर्ण झालेबाबत उपयोगिता प्रमाणपत्रे कामपूर्णत्वाचे दाखले व मुल्यांकन दाखले लेखापरीक्षणासाठी उपलब्ध झाले नाहीत.

5) घरकुलाचे अनुदान लाभार्थ्यांना हप्त्या हप्त्याने देणे आवश्यक होते. पंचायत समितीने संपूर्ण अनुदान ग्रामपंचायत स्तरावर वितरीत केले आहे.

6) योजनेचा लाभ घेतलेबाबत मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

**4.458 मागासवर्गीयांना जुने घर दुरुस्ती अर्थसहाय्य अनुदानाबाबत.**

**पंचायत समिती वैभववाडी, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदर योजनेवर पंचायत समिती वैभववाडी यानी रक्कम रुपये 2,75,000/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जुने घरदुरुस्तीसाठी अर्थसहाय्य दिलेल्या लाभार्थ्यांचे मूळ मंजुर प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

2) अर्थसहाय्य देण्यात आलेल्या लाभार्थ्यांचे जुने घरदुरुस्ती पूर्वीचा व दुरुस्ती नंतरचे फोटो लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे लाभार्थी निवड योग्य असल्याची खात्री होत नाही. तरी संबंधित लाभार्थींचे घरदुरुस्ती पूर्वीचे व दुरुस्तीनंतरचे फोटो प्राप्त न झाल्यास त्यावर खर्च केलेली रक्कम रुपये 2,75,000/- वसुल करणे आवश्यक आहे.

3) सक्षम प्राधिका-याने मुल्यांकन दाखले, उपयोगिता प्रमाणपत्रे दिलेली नसताना सदर रक्कम कोणत्या निकषान्वये वितरित केली**?**

4) शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्रमांक 1084/प्र.क्र./55/34, दिनांक 5/10/1989 अन्वये दुबार लाभ टाळणेसाठी लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

5**)** ग्रामपंचायत स्तरावर वितरीत करण्यात आलेले अनुदान संबंधित लाभार्थ्यांना पोहोच झालेबाबत लाभार्थ्यांच्या पोहोच पावत्या प्राप्त झाल्या नाहीत.

**4.459 जिल्हा परिषद उपकरातून आदिवासी यांना घरकुल योजनांतर्गत 95 टक्के अनुदानावर घरकुल योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती पेठ**, **जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदर योजनांतर्गत प्राप्त अर्जाची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील ठराव क्रमांक 79, दिनांक 17/02/2014 अन्वये 05 लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. तांत्रिक मंजूरी आदेशातील अटी व मार्गदर्शक सूचनांनुसार लाभार्थीचे घरकुल अर्जावर सभापतीनी शिफारस केलेबाबत स्वाक्षरी करण्यात आलेली नाही.

2) सदर योजनेमध्ये पाया खोदकाम / जोता बांधकामासाठी रुपये 35,000/- प्रथम हप्ता व दुसरा हप्ता रक्कम रुपये 35,000/- छतापर्यंत पुर्ण केलेबाबत संबंधित अभियंता यांचेकडील पुर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन प्रदान करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

योजनेचे लाभार्थी श्री.दिनकर आबाजी भोये - रा.कुंभाळे, श्री.अविनाश सदाशिव गावित - रा.राजबारी, श्री.विलास मुरलीधर वळवी - रा.जेमखड या लाभार्थीचे पुर्वीचे वीज कनेक्शन असल्याबाबत दिसून येते. परंतु नमुना नंबर 8 हा बखळ जागा दर्शविण्यात येवून अनुदानाचा लाभ घेतलेला आहे. योग्य लाभार्थीची निवड केलेली दिसून येत नाही.

**4.460 पंचायत समिती सेस 3 टक्के अनुदानातून 100 टक्के अनुदानावर अपंगांसाठी कॅलीपर प्लॅस्टीक मोल्डींग वाटप करणे योजनेतील अनियमिततांबाबत.**

**पंचायत समिती मालेगांव**, **जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 72) -** पंचायत समिती सेस 3 टक्के अनुदानातून 100 टक्के अनुदानावर अपंगांसाठी कॅलीपर प्लॅस्टीक मोल्डींग वाटप करणेसाठी रुपये 48,950/- खर्च करणेत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार योजना राबविणेत आली नाही.

2) लाभार्थ्यांची मागणी तपासणीस उपलब्ध न झाल्याने मागणीप्रमाणे खरेदी केली किंवा कसे,याची खात्री व सत्यता पटत नाही. तसेच सक्षम प्राधिकारी यांनी मंजूर केलेली लाभार्थी यादी नस्तीसोबत पहावयास मिळाली नाही. पात्र व निवड झालेल्या लाभार्थी संख्ये इतकीच खरेदी करणे आवश्यक होते. मात्र संबंधितांनी लाभार्थी निवड करण्याची कार्यवाही योग्य प्रकारे केलेली नाही. त्यामुळे 5 नग शिल्लक असल्याचे दिसून येते.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक मागास/ 1089/प्र.क्रमांक 5534,दिनांक 05/10/1989 नुसार, पंचायत समितीने लाभार्थी नोंदीची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे लाभार्थ्यास या योजनेतून यापुर्वी लाभ दिला किंवा कसे याची पडताळणी करणे शक्य झाले नाही. लाभार्थीच्या नोंदी नसलेने दुबार लाभ दिला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) योजना ज्या वर्षात राबविली त्याच वर्षात साहित्य वाटप होणे आवश्यक आहे. तथापि सदर योजनेतील प्राप्त साहीत्य केव्हा वाटप करण्यात आले याचा दिनांक साठा नोंदवहीवर नमूद केलेला नाही.

5) एकूण 15 लाभार्थ्यांना प्रत्येकी 7 काठी वाटप केल्याचे साठा नोंदवहीवरुन दिसून येते. सदर 15 लाभार्थ्यांचे प्रस्ताव लेखा परीक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे सदर लाभार्थी योजनेचा लाभ घेण्यास पात्र होते किंवा कसे याबाबत लेखा परीक्षणात तपासणी करता आली नाही.

**4.461 मागासवर्गीयांसाठी पंचायत समिती सेस अनुदानातुन 5 एचापी इंजिन पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती नांदगांव, जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 56) -** मागासवर्गीयांसाठी पंचायत समिती सेस अनुदानातुन 5 एचपी इंजिन पुरविणेसाठी रूपये 4,80,000/- एवढा खर्च करणेत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 अन्वये योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी नमुद वेळापत्रकानुसार करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1089/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 नुसार लाभार्थीचे प्रपत्र “अ” मध्ये नोंदवही ठेवून (मास्टर नोंदवही) लाभार्थ्यांना दुबार लाभटाळण्याचे दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही नाही. लाभार्थ्यास दुबार लाभ दिला नसलेचे प्रमाणित होणे आवश्यक आहे.

3) पंचायत समितीचे मासिक सभेतील ठरावानुसार योजनेची निवड करणेत आलेली असून लाभार्थ्यांची निवडयादी पहाण्यास मिळाली नाही. पुरवठादाराकडून राष्ट्रीयकृत बँकेची 10 टक्के रक्कमेची बँक गॅरंटी प्राप्त केलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 83 (3) आणि महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/ (2512)/उद्योग-6, दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद 8.6 नुसार साहित्य प्राप्त झालेनंतर म.गटविकास अधिकारी यांनी प्रमाणपत्र नमूद केलेले नाही. साहित्याचा दर्जाबाबतचा चाचणी अहवाल प्राप्त नाही.

5) नमुना नंबर 33 साठा नोंदवहीवर 5 एचपी इंजिन प्राप्त झालेल्या दिनांक नमूद नाही. सदरचे साहित्य अदयाप पर्यंत वाटप करण्यांत आलेले नाही. त्यामुळे खरेदी केलेल्या साहित्याचा लाभार्थ्यांना लाभ झालेला नाही. साहित्य वाटप झालेनंतर लाभार्थीचे उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करावे.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1089/प्र.क्र.73/34,दिनांक 20/10/1999 मागासवर्गीयांच्या कल्याणासाठीच्या योजनांतर्गत 30 टक्के रक्कम महिलांसाठी खर्च करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

**4.462 पंचायत समिती सेस मधुन 100 टक्के अनुदानावर लाभार्थ्यांना पन्हाळी पत्रे पुरविणे बाबत. (सेस फंड).**

**पंचायत समिती जळगांव, जिल्हा जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती, सेस अंतर्गत 20 टक्के समाजकल्याण तरतुदीतून 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीय लाभार्थ्यांना पन्हाळी पत्रे पुरविणेसाठी रुपये 4,46,950/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्रक्र 446/वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्याचे वेळापत्रक ठरवुन दिलेले असतांना वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) विभागाने मास्टर नोंदवही ठेवलेली नसल्याने एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ दिला जाऊ नये याबाबत उपाय योजना केलेली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/1093/प्रक्र/1239/ 34, दिनांक 01/01/1993 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात वाटप होणे आवश्यक आहे. तथापि कार्यवाही झालेली नाही.

4) पंचायत समिती, जळगांव कार्यालयास आवक पत्र क्रमांक 383,दिनांक 25/11/2013 नुसार पुरवठादार केपी स्टील, औरंगाबाद यांचेकडुन लेखी प्राप्त झाले. सदर पत्रात पन्हाळी पत्रांचे दर रुपये 1,160/- प्रमाणे देण्याचे नमुद केले असतांना त्याच खरेदीदाराकडून रुपये 1,277/- प्रमाणे खरेदी करण्यात आले. त्यामुळे जादा रुपये 117 x 350 नग = रुपये 40,950/- चे जादा दराने खरेदी केलेली आहे. त्यामुळे शासकीय वित्त हानी झालेली आहे.

5) शासन निर्णय मागास 1093/प्रक्रं/1239/34,दिनांक 01/09/1993 1/22 अन्वये गवती छप्पर बदलुन टीनपत्रे टाकणेबाबत अनुक्रमांक 7 प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

6) विनियोग दाखल्यावर ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

**4.463 20 टक्के निधी मधुन मागासवर्गीयासाठी शिलाई मशिन खरेदीबाबत.**

**पंचायत समिती रावेर, जिल्हा जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1) -** पंचायत समिती रावेर, अतंर्गत 20 टक्के निधीमधून मागासवर्गीयांसाठी शिलाई मशिन खरेदी करीता रुपये 3,00,000/- खर्च करण्यात आला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) टिपणी केव्हा सुरु केली व कधी मंजुर झाली, याबाबतच्या तारखा नमुद नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 96 प्रमाणे रक्कम अदा करण्यापूर्वी माल साठा नोंदवहीत त्याचा दर्जा, प्राप्त साहित्य नगाप्रमाणे प्रमाणपत्र देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्रक्र 496/वित्त्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविलेली नाही. ग्रामविकास विभागाकडील परिपत्रक क्रमांक मागास 1089/प्रक्र/597/34,दिनांक 05/10/1989 नुसार सर्व योजना अंतर्गत लाभ दिला जाणा-या लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही परिरक्षीत केलेली नाही.

4) खरेदी केलेल्या साहित्याची त्याच वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक असताना दिनांक 31/03/2015 अखेर साठा नोंदवहीत शिलाई मशिन नग 24 शिल्लक असून लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेले नाही. तसेच लाभार्थ्यांचे प्रस्ताव अप्राप्त आहेत. मंजुर लाभार्थी यादी व प्रस्ताव नसतांना साहित्याची खरेदी करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर आर्थिक वर्षात लाभ मिळालेला नाही. त्यामुळे योजनेचा मुळ उद्देश सफल झालेला नाही.

**4.464 20 टक्के निधी मधुन मागासवर्गीया साठी ताडपत्री खरेदीबाबत.**

**पंचायत समिती रावेर, जिल्हा जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** 20 टक्के निधीमधून मागासवर्गीयांसाठी ताडपत्री खरेदी करीता रुपये 3,64,896/- खर्च करण्यात आला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) टिपणी केव्हा सुरु केली व कधी मंजुर झाली याबाबतच्या तारखा नमुद नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 96 प्रमाणे रक्कम अदा करण्यापूर्वी माल साठा नोंदवहीत त्याचा दर्जा, प्राप्त साहित्य नगाप्रमाणे प्रमाणपत्र देणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्रक्र496/वित्त 9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविलेली नाही. ग्रामविकास विभागाकडील परिपत्रक क्रमांक मागास 1089/प्रक्र/597/34,दिनांक 05/10/1989 नुसार सर्व योजना अंतर्गत लाभ दिला जाणा-या लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही परिरक्षीत केलेली नाही.

4) खरेदी केलेल्या साहित्याची त्याच वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक असतांना दिनांक 31/03/2015 अखेर साठा नोंदवहीत ताडपत्री नग 96 शिल्लक असुन लाभार्थ्याना वाटप करण्यात आलेले नाही. तसेच लाभार्थ्यांचे प्रस्ताव अप्राप्त आहेत. मंजुर लाभार्थ्याची यादी नसतांना साहित्याची खरेदी करण्यात आलेली आहे.

5) पुरवठादाराला देयकाची रक्कम प्रदान करतांना नियमानुसार आयकराची रक्कम रुपये 8,393/- कपात करण्यात आलेली नाही.

**4.465 उपकराच्या 20 टक्के निधीतुन मागासवर्गीयांना टीन पत्रे पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती चाळीसगांव, जिल्हा जळगांव, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** 20 टक्के निधीतून मागासवर्गीयांना टीन पत्रे पुरविणेसाठी रक्कम रुपये 15,00,000/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक.झेडपीए/2000/प्र.क्र.446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार, योजना राबविणेसाठी निश्चित केलेल्या कालावधीनुसार प्रक्रीया राबविण्यांत आलेली नाही.

2) दिनांक 31/03/2015 पर्यत 1045 नग साठा शिल्लक असल्याचे साठा नोंदवहीवरुन दिसुन आले. लाभार्थी योजनेपासुन वंचित राहील्याने योजना राबविण्यांचा उद्देश सफल झालेला नाही.

3) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, जिल्हा परिषद-ए 2009/प्र.क्र.514/ वित्त-9, दिनांक 20/11/2009 अन्वये कंत्राटदाराकडुन रक्कम रुपये 600/- चा मुद्रांक शुल्क करारनामा करण्यांत आलेला नाही.

**4.466 पंचायत समिती सेस उत्पन्नाच्या 20 टक्के मागासवर्गीय व 10 टक्के आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थीनींना लेडीज सायकल पुरवीणे.**

**पंचायत समिती शेवगांव, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2 व 3) -** सदर योजनेची निवड पंचायत समिती ठराव क्रमांक 314 व 315,दिनांक 14/07/2014 अन्वये केली असून सदर योजनेवर रक्कम रुपये 5,60,358/- खर्च नोंदविलेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ठरावात लाभार्थींची मंजूर यादी नमुद केलेली नाही. त्यामुळे लाभार्थीची निवड कशाचे आधारे केली याबाबत पडताळणी करता आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/ 2008/प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 नुसार सदरची योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविणेत आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा, व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-1088/(2512)/उद्योग-6,दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद क्रमांक 6 मध्ये नमूद केल्याप्रमाणे सायकल खरेदी मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेमार्फत करणे बाबत राखीव आहे. तथापि, त्याप्रमाणे कार्यवाही न करता खाजगी दुकानातून सायकल खरेदी केली आहे. सदरची बाब नियमबाहय आहे.

**4.467 10 टक्के महिला व बालकल्याण व 3 टक्के अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत जिल्हा परिषद सेस मधून पिकोफॉल मशीन पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती जामखेड, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4 व 5) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रशासकिय आदेशाच्या अटी व शर्ती अन्वये मान्यता प्राप्त संस्थेकडून शिवण कलेचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना कोणत्याही लाभार्थ्यांचे प्रमाणपत्र घेतलेले नाही.

2) उपरोक्त कामाचे प्रशासकीय मंजुरी लेखापरिक्षणास प्राप्त न झाल्याने लाभार्थी हिस्सा किती व पिको-फॉलची रक्कम किती याबाबत पडताळणी करता आली नाही. तसेच 10 टक्के लाभार्थी हिस्सा एकही लाभार्थ्यांकडून वसूल केलेली नाही.

3) 80 टक्के प्रकरणे अपूर्ण असतांना कोणत्या आधारे प्रकरणाला मंजुरी दिली व वाटप केले खुलासा करावा.

4) प्रशासकीय मंजुरीच्या अटी व शर्ती अन्वये पिको फॉल मशीन वाटपासाठी लाभार्थ्यांचे वय हे 18 ते 45 वर्षाच्या कालावधीत देय असतांना संबंधीतांनी वयात बसत नसतांना पिकोफॉल मशीनचे वाटप केलेले आहे. तरी अकरा पिको फॉल मशीन रक्कम संबंधीताकडून वसूल प्राप्त ठरते.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, आदेश क्रमांक 1089, प्रकरण क्रमांक 555, दिनांक 05/07/1990 अन्वये एका पेक्षा जास्त लाभ देऊ नये. असे असतांना देखील एकाच रेशनकार्ड वर दोन लाभार्थ्यांचे नाव असतांना दोघांना लाभ दिल्यामुळे एका पिकोफॉलची रक्कम वसुल करुन पूर्तता दर्शवावी.

6) प्रशासकीय अटी शर्ती अन्वये मा. तहसिलदार यांच्या उत्पन्न दाखल्यानुसार जास्तीत जास्त वार्षिक उत्पन्न रुपये 32,000/- असेल त्याच लाभार्थ्यांना पिको फॉल मशीन देय आहे. परंतु 7 लाभार्थ्यांचे रुपये 32,000/- पेक्षा जास्त उत्पन्न असल्याने लाभार्थ्यांना पिको फॉल मशीन वाटप केले आहे. तरी सदर पिको फॉल मशीन वसुलपात्र ठरते.

7) लेखापरिक्षण कालावधीपर्यंत 10 मशिन वाटप केलेले नाहीत.

**4.468 20 टक्के समाज कल्याण व 3 टक्के अपंग कल्याण योजने अंतर्गत पंचायत समिती सेसफंडातुन सौरकंदिल खरेदीतील अनियमितेबाबत.**

**पंचायत समिती आंबेगाव, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 25 व 26) -** पंचायत समिती उपकर निधीतून 20 टक्के समाजकल्याण व 3 टक्के अपंग कल्याण योजने अंतर्गत उपलब्ध तरतुदीतून उपयोगी वस्तू वाटपाच्या योजनेत सौर कंदिल वाटपाची योजना राबविणेकरिता 100 टक्के अनुदानावर 554 सौरकंदिल खरेदीसाठी रक्कम रुपये 21,37,029/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना राबविताना शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचे वेळापत्रक ठरवून दिलेले असतांना या वेळापत्रकानुसार कार्यवाही न करुन अनियमितता झालेली आहे.

2) 20 टक्के समाजकल्याण योजने अंतर्गत श्रीमती कुंदा सखाराम गवारी (राजापूर) श्री.जालिदंर दत्तू कुहाडे (निगडाळे), श्री.अनाजी धोंडू गभासे (गोहे खु) यांचा जातीचा दाखला घेण्यात आलेला नाही.

3) श्री ज्ञानेश्वर होनाजी कोळप (पोखरी) श्री. पांडूरंग आवजी काठे (आहाने) श्री. भगवान रामचंद्र काळोखे (चास) यांचे उत्पन्नाचे दाखले घेतलेले नाहीत.

4) 3 टक्के अपंग कल्याण योजने अंतर्गत योजना सन 2014-15 या वित्तीय वर्षासाठी असतांना लाभार्थी 1.श्री.जालिंदर किसन थोरात, कळंब 2. दशरथ ज्ञानेश्वर सुरसे, लौकी 3. प्रभाकर दारकू लबडे, जारकरवाडी 4. गणेश बाळासो बारवे,चास 5. श्रीमती अनिता राजेंद्र सैद, मंचर यांचे उत्पन्नाचे दाखले माहे मार्च 2015 नंतरचे असतांना नियमबाह्यपणे लाभ दिला आहे.

माहे मार्च 2015 अखेर 594 नग सौर कंदिलाचे वाटप करण्यात आलेले नाही. शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचा खरा हेतू साध्य न होता 594 लाभार्थी वंचित राहिलेले आहेत. याचा अर्थ सन 2014-2015 मधील 594 लाभार्थी लाभापासून वंचित राहून अनुदानाची रक्कम रुपये 21,37,029/- विनाकारण गुंतून पडली आहे.

**4.469 20 टक्के समाजकल्याण अंतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सायकल पुरविणे कामामधील अनियमिततेबाबत**

**पंचायत समिती जुन्नर, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 31) -** पंचायत समिती जुन्नर यांनी उपकर निधीमधून शासन दरकरारानुसार 207 जेन्टस सायकली व 205 लेडीज सायकली अनुक्रमे रूपये 3,512/- व रूपये 3,555/- या दराने प्रमाणक क्रमांक 45 दिनाक 31/03/2015 अन्वये एकूण रक्कम रूपये 14,55,759/- इतकी मे. कोहीनूर सायकल प्रायव्हेट लिमिटेड यांना अदा केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) केंद्र शासन दर करारानुसार सदर खरेदीसाठी दिनांक 16/03/2015 रोजी मे. कोहीनूर सायकल प्रायव्हेट लिमिटेड, लुधियाना, पंजाब यांना दिलेल्या पुरवठा आदेशान्वये पुरवठा चलनावर सायकली प्राप्त झालेबाबत गटविकास अधिकारी यांनी स्वाक्षरी करतांना दिनांक नमुद केलेला नाही.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए/प्र.क्र.456/वित्त 6 दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्यासाठी आवश्यक त्या विहीत कालावधीच्या वेळापत्रकाचे पालन झालेले नाही. तसेच विनियोग दाखले दप्तरी उपलब्ध नाहीत.

3) पुरवठा केलेल्या साहित्याची सक्षम प्राधिकारी/ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून तपासणी केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2001/ प्र.क्र.132/पंरास 26, दिनांक 05/09/2002 अन्वये जिल्हा परिषदेच्या खरेदी समितीने उद्योग संचालनालयाच्या मध्यवर्ती भांडार समिती कडून सायकल खरेदीवेळी महाराष्ट्र शासनाचा दर करार नसल्याची खात्री केलेली नाही.

5) इयत्ता 5 वी ते 7 वी मधील लाभार्थ्यांची निवड करताना अनुसुचित जातीच्या लाभार्थ्यांना तहसीलदार यांनी दिलेल्या जातीच्या दाखल्या ऐवजी शाळेच्या बोनाफाईड दाखल्यावरील जातीच्या आधारे सदोष लाभार्थी निवड केलेली आहे.

6) लाभार्थी प्रस्तावांमध्ये 30 लाभार्थी प्रस्तावांसोबत बोनाफाईड दाखले नाहीत. सदर योजना इयत्ता 5 वी ते 7 वीच्या विद्यार्थ्यांसाठी असताना इयत्ता 8 वीच्या विद्यार्थ्यांना लाभ दिलेला आहे. तसेच मुलांनी शाळा सोडली असतांना त्यांना लाभ दिलेला आहे. त्यामुळे या अपात्र 30 लाभार्थ्यांना लाभ दिल्यामुळे 30X3512=1,05,360/- एवढी वसुली करण्यात यावी.

7) लेखापरीक्षण कालावधी अखेर म्हणजे दिनांक 19/12/2015 अखेर लेडीज सायकल 21 व जेन्ट्स सायकल 28 विनावाटप शिल्लक होत्या त्यामुळे योजना राबविणेचा उद्देश सफल झालेला नाही.

**4.470 जिल्हा परिषदेकडून प्राप्त समाज कल्याण विभागाकडील साहित्य वाटपाबाबत.**

**पंचायत समिती वेल्हा, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 49) -** पंचायत समिती वेल्हा सन 2014-15 मध्ये जिल्हा परिषद पुणेकडून प्राप्त साहित्य त्याचे वाटप व शिल्लक याबाबत समाज कल्याण विभागाकडील विविध साहित्य वाटपाबाबतच्या नोंदवही व प्रस्ताव याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या साहित्याचे डिलीव्हरी चलने लेखा परीक्षणास प्राप्त झाली नाहीत.

2) प्राप्त साहित्याच्या नोंदीसाठा नोंदवही नमुना नं. 33 वर घेण्यात आलेल्या असुन, वाटप दाखविण्यात आले आहे. परंतु लाभार्थ्यांना वाटप केलेल्या वस्तुचे मुल्य नोंदविलेले नाही.

3) सन 2014-15 मधील साहित्याचा त्याच वर्षात लाभ देणे आवश्यक असताना, सन 2015-16 मध्ये वाटप झाल्याने लाभार्थी लाभापासून वंचित राहील्याचे दिसुन येते.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास 1020/ प्रक्र.14/38,दिनांक 09/02/2001 मध्ये लाभार्थी निवडीचे निकष नमूद केलेले असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. कागदपत्रे अपुर्ण असताना, वाटप का करण्यात आले आहे.तसेच लाभार्थी प्रस्तावासोबत जोडलेली कागदपत्रे तपासताना लाभार्थीचे उत्पन्न व जातीचे दाखले महसूल विभागाच्या सक्षम प्राधिका-याऐवजी ग्रामसेवक / सरपंच यांचे स्वाक्षरीचे उत्पन्नाचे व जातीचे दाखले स्वत:च्या स्वाक्षरीचे नियमबाह्यरित्या दिलेले आहे.

**4.471 90 टक्के अनुदानावर 3 टक्के अपंग लाभार्थींना ताडपत्र्या पुरविणे.**

**पंचायत समिती खंडाळा, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती खंडाळा यांनी पंचायत समिती उपकर निधीतून अपंग लाभार्थ्यांना ताडपत्र्या पुरवठाकरणेकामी ताडपत्र्या खरेदीवर रक्कम रुपये 7,80,927/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/सीआर/ 418/34, दिनांक 14/09/1989 नुसार प्रथम लाभार्थी निवड करुन पंचायत समिती सभेमध्ये मान्यता घेण्यात आलेली नाही.

2) निवड लाभार्थ्यांचे प्रस्तावावर गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. सदर प्रस्ताव निवड कशाच्या आधारे केली याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) पंचायत समिती ठराव क्रमांक 838, दिनांक 25/06/2014 च्या इतिवृत्तात लाभार्थी निवड केल्याचे दिसून येत नाही. लाभार्थी निवडीची प्रक्रिया न करता नियमबाहयपणे योजनेची अंमलबजावणी केली आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र. 446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 अनसार विहीत वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 50(4) नुसार प्रथम 10 टक्के लाभार्थी हिस्सा वसुल करणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही केलेली नाही. लाभार्थी हिस्सा रक्कम रुपये 86920/- जमा करुन पुरवठादारास आदा केल्याची पोहोच पावती पहावयास मिळाली नाही.

6) लाभार्थ्यांकडून रुपये 100/- चे स्टँप पेपरवर विक्री/हस्तांतरण करार नसल्याबाबत हमीपत्र घेतले नाही.

7) दुबार लाभ टाळण्याचे दृष्टीने शासन परिपत्रक क्रमांक 1098/प्र.क्र.73/34,दिनांक 20/10/1999 नुसार मास्टर नोंदवही ठेवली नाही.

**4.472 मागासवर्गीय लाभार्थ्यांना घरघंटी पुरविणे.**

**पंचायत समिती कोरेगांव, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती कोरेगांव, यांनी पंचायत समिती उपकर निधीतून मागासवर्गीय लाभार्थ्यांना 100 टक्के अनुदानावर घरघंटी पुरविणे या योजनेवर रक्कम रुपये 699614/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजनेच्या तांत्रिक मंजूरीचे समाजकल्याण अधिकारी यांचे आदेश दिनांक 25/02/2015 आढळून आले नाहीत.

2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांचे आदेश क्रमांक मबाक/शिम/कावि/15, दिनांक 18/02/2015 अन्वये मे. श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर यांचे रुपये 10,442/- प्रतिनग निश्चित केलेल्या दर स्विकृतीप्रमाणे दर निश्चित केले असून वेगळी प्रक्रिया राबविली नाही. जिल्हा स्तरावरील निविदा प्रक्रियेत सदर खरेदीचा समावेश नसल्याने महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक 02/01/1992 अन्वये स्वतंत्र निविदा काढणे आवश्यक होते.

3) पुरवठा आदेश दिनांक 25/02/2015 नुसार 45 दिवसांत अथवा दिनांक 31/03/2015 यापैकी कमी असेल त्या कालावधीत पुरवठा करणे आवश्यक आहे. तथापि डिलीव्हरी चलन स्विकृती पोहोचवर दिनांक नाही. त्यामुळे वेळेत पुरवठा झाल्याची खात्री झालेली नाही.

4) सदर पुरवठा वस्तुंची तपासणी करण्यात आली नसल्याने खरेदी वस्तू योग्य मानांकनाच्या व सुस्थितीत मिळाल्याची खात्री होत नाही.

5) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही अद्यावत नसल्याने एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक व्यक्तींना लाभ दिला नसल्याची खात्री करता येत नाही.

**4.473 मागासवर्गीय मुलांना 100 टक्के अनुदानावर जेन्ट्स सायकल खरेदी करुन वाटप करणेबाबत.**

**पंचायत समिती फलटण, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती फलटण, जिल्हा परिषद सातारा पंचायत समिती उपकर निधीतून जेन्ट्स सायकल खरेदीसाठी रक्कम रुपये 9,97,152/- एवढा खर्च केला आहे.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 अनुसार पंचायत समिती स्तरावरील योजना राबवितांना विहीत वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय दिनांक 01/09/2015 अनुसार गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवली नसल्याने दुबार लाभाची पडताळणी करता आली नाही.

3) सदर योजना सन 2014-15 ची असून प्राप्त 312 सायकलींपैकी 35 सायकली दिनांक 31/03/2015 पर्यंत वाटप झाले असून उर्वरीत 277 सायकल वाटपाअभावी शिल्लक असल्याने योजना प्रभावीपणे राबविली नाही.

4) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 6 नुसार रुपये 100/- चे स्टँपपेपरवर करारनामा केला नाही.

**4.474 घरकुल बांधकामासाठी मदत खर्चाबाबत.**

**पंचायत समिती खटाव, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती खटाव (वडूज) यांनी घरकुल बांधकामाचे मदतीसाठी रक्कम रुपये 7,40,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 अनुसार पंचायत समिती उपकर निधीच्या योजना राबविणेसाठी विहीत वेळापत्रकाचे पालन झालेले नाही.

2) लाभार्थी निवड यादीस मासिक सभा दिनांक 20/08/2015 ठराव क्रमांक 17 अन्वये कार्योत्तर मंजूरी घेतली आहे. सदर ठराव उपलब्ध नाही. तसेच लाभार्थी निवड न करता खर्च केला आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 4 परिशिष्ट क्रमांक 2 नुसार योजनांना तांत्रिक मंजूरी अधिकार विहीत केले आहेत. तथापि योजनेची अटी शर्ती निश्चित न करता व तांत्रिक मंजूरी न घेता नियमबाहयपणे योजना राबविली आहे.

4) सदर योजनेस तांत्रिक मंजूरी घेतली नाही. तथापि अर्जात नमूद केल्यानुसार रुपये 23,000/- चे मुल्यांकन दाखले प्राप्त झाल्यावर दुसरा हप्ता रुपये 20,000/- द्यावयाचा असतांना 4 लाभार्थींना मुल्यांकन प्राप्त नसतांना दुसरा हप्ता दिला आहे.

5) श्री. गजानन नारायण चव्हाण व श्री धनंजय नारायण चव्हाण रा. बुध यांची कागदपत्रे समान आहेत. कुटुंबातील एकाच व्यक्तीस लाभ अनुज्ञेय असल्याने दुबार लाभ रुपये 40,000/- वसुली करणे आवश्यक आहे.

6) ज्या लाभार्थ्यांस घरबांधणेसाठी मदत द्यावयाची आहे त्यांचे घर छप्परवजा असणे आवश्यक आहे, तथापि 4 लाभार्थ्यांची कागदपत्रे पाहता दगड माती सिमेंट पत्र्याची इमारत असल्याने मदत अनुज्ञेय ठरत नाही. रक्कम रुपये 1,00,000/- वसुली करणे आवश्यक आहे.

7) श्री. रवि मल्हारी चव्हाण, श्रीमती उज्वला रामदास चव्हाण, श्री. आकाराम श्रीपती सकट, यांचे ग्रामपंचायत नमुना नंबर 8 उपलब्ध नसल्याने मालकीची पडताळणी करता आली नाही.

8) श्री. राजु एकनाथ खुडे यांचा नमुना नंबर 8 पहाता घराची मालकी श्री. एकनाथ आबा खुडे यांची आहे. त्यासाठी ॲफिडेव्हिट घेणे आवश्यक आहे.

**4.475 3 टक्के अपंग निधी अंतर्गत 80 टक्के अनुदानावर कडबाकुट्टी पुरविणे.**

**पंचायत समिती खटाव, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती खटाव, जिल्हा परिषद सातारा यांनी 3 टक्के अपंग निधीअंतर्गत 80 टक्के अनुदानावर कडबाकुट्टी पुरविणेसाठी रक्कम रूपये 4,34,584/- एवढा खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 125 नुसार विकास योजना सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजूरीशिवाय कार्यन्वित करता येत नाहीत असे आदेश असतांनाही प्रशासकीय मान्यता न घेता खर्च केला आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 4 व परिशिष्ट 2 नुसार तांत्रिक मंजूरी न घेता व योजनेच्या अटी शर्ती निश्चित न करता नियमबाहयपणे योजना राबविली आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/ प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 नुसार पंचायत समिती उपकर योजनांबाबत विहीत वेळापत्रकाचे पालन न करता प्रत्येक टप्प्यावर विलंब झालेला आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय पंरास/सीआर/ 1633/57, दिनांक 19/01/1988 नुसार लाभार्थी हिश्याची रक्कम प्रथम वसुली केली नाही.

5) साठा नोंदवही अपूर्ण असून दिलेल्या वस्तू व शिल्लक वस्तू यांच्या नोंदी संबंधितांनी साक्षांकित केलेल्या नाहीत.

6) लाभार्थ्यांची वयोमर्यादा किमान 18 व कमाल 50 वर्षे असणे आवश्यक असतांना श्री. बापूराव किसन माने यांचे वय 54 असून लाभार्थी पात्र नसल्याने रुपये 12,360/- वसूल करणे आवश्यक आहे.

7) प्राप्त कडबाकुट्टी यांचे सन 2015-16 मध्ये वाटप केले आहे. सबब योजना सन 2014-15 या वर्षात राबविली गेली नसल्याचे लाभार्थी वंचित ठेवल्याचे स्पष्ट होते.

8) योजनेच्या सफलतेबाबत फलश्रृती अहवाल व विनियोग दाखले प्राप्त करणे आवश्यक आहे.

**4.476 20 टक्के समाजकल्याण निधीतून मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन पुरविणे.**

**पंचायत समिती कराड, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती कराड यांनी सदर योजनेतून पंचायत समितीने रुपये 1,98,987/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मध्ये विहीत केलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही न करता प्रत्येक टप्प्यावर विलंबाने कार्यवाही केलेली आहे.

2) प्राप्त साहित्याच्या मालसाठा नोंदवहीतील नोंदीवर गटविकास अधिकारी यांनी दिनांकित स्वाक्षरी न केलेने मालाच्या वेळेत पुरवठयाची खात्री होत नाही. तसेच सन 2015-16 मधील 22 नग विनावाटप शिल्लक राहिल्याने त्यामध्ये रुपये 76,802/- इतका निधी गुंतून पडलेला आहे.

3) साहित्य पुरवठादाराकडून रक्कम मिळालेबाबतची पोहोच घेण्यात आलेली नाही. तसेच शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, दिनांक 20/10/1999 नुसार लाभार्थ्यांची विहीत नमुन्यातील मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

4) लाभार्थी पात्रता निकषानुसार लाभार्थ्यांचा उत्पन्न दाखला तहसिलदार यांचा आवश्यक असतांना एका लाभार्थ्याचा दाखला गाव कामगार तलाठी यांचा असल्याने तो मान्य करता येणार नाही. तसेच योजनेच्या सफलतेबाबत फलश्रृती अहवाल व विनीयोग दाखले घेणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झालेली नाही.

**4.477 मागासवर्गीय कुटुंबांना घरघंटी वाटपाबाबत.**

**पंचायत समिती जावली, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती जावली यांनी मागावर्गीय कुटुंबांना घरघंटी वाटप करणे या योजनेवर रक्कम रुपये 2,08,840/- इतका खर्च केलेला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, दिनांक 20/06/2008 मध्ये निश्चित केल्यानुसार वेळापत्रकानुसार कार्यवाही केलेली नाही.

2) मासिक सभेतील लाभार्थी निवड ठरावामध्ये नावे नमूद न करता केवळ संख्या नमूद करुन नियमाबाहयरित्या मंजूरी घेतलेली आहे.

3) एकूण 20 लाभार्थ्यांपैकी 12 लाभार्थ्यांचे प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलबध झालेले नाहीत. तसेच वाटप केलेल्या साहित्याच्या पोहोचवर दिनांक नमूद नसलेने प्रत्यक्षात साहित्य केव्हा वाटप केले याची खात्री देता येत नाही.

4) शासन परिपत्रक, ग्रामविकास विभाग दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही तसेच साहित्य वाटपानंतर लाभार्थ्यांची आर्थिक सुधारणा झाल्याचे गटविकास अधिकारी यांनी विनीयोग दाखल्यांआधारे प्रमाणीत करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झालेली नाही.

**4.478 पंचायत समिती सेस फंडातून तीन चाकी सायकल वाटपाबाबत. (सेस फंड).**

**पंचायत समिती आटपाडी, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती आटपाडी यांनी पंचायत समिती सेस फंडातून तीन चाकी सायकल खरेदीसाठी रक्कम रुपये 79,500/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/33/प्रमाणक क्रमांक 446/वित्त9, दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषद/पंचायत समिती स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणीसाठीचे वेळापत्रक निश्चित केले आहे. सदरच्या वेळा पत्रकाप्रमाणे या योजनाचे अंमलबजावणी झालेली नाही.

2) मास्टर लाभार्थी नोंदवही उपलब्ध झाली नाही.

3) महाराष्ट्र शासन, जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1093/सीआर/1947, दिनांक 02/07/1993 नुसार लाभार्थी कडून विनियोग प्रमाणपत्र घेतले नाही. काही लाभार्थाच्या प्रस्तावासोबत जोडलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र साक्षांकित केले नाही.

4) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन क्रमांक 1093/2665/उद्योग-6, दिनांक 16/07/1993 नुसार रक्कम रुपये 50,000/- च्या वरील खरेदी हि राजपत्रात निविदा प्रसिध्द करून निविदा मागविणे आवश्यक होते तशी कार्यवाही केली नाही.

**4.479 वृध्द कलाकार मानधन वाटप योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती शिरोळ, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती शिरोळ, समाजकल्याण विभागाने शासन निधी मधून वृध्द कलाकारांना मानधन वाटप करण्याकरिता रक्कम रुपये 9,99,224/- इतका खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक, सांस्कृतिक कार्य. संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक सांकास/ मानधन/वाढीव निधी/प्र.क्र/2014-15/85, दिनांक 09/03/2015 नुसार वृध्द कलाकार मयत झालेस त्याची माहिती दर महिन्यांनी संचालनालयास सादर करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

2) तीन मयत कलाकारांना माहे फेब्रुवारी 2014 ते फेब्रुवारी 2015 अखेर प्रत्येकी 16,274/- प्रमाणे आदा केलेली मानधनाची रक्कम रुपये 48,822/- वसूल करुन शासन निधीत भरणा करणे आवश्यक आहे.

**4.480 पंचायत समिती सेस 20 टक्के राखीव निधी मागासवर्गीय शेतकऱ्यांना प्लॉस्टीक ताडपत्री वाटप करणेबाबत.**

**पंचायत समिती कागल, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 37) -** पंचायत समिती कागल, यांनी उपकर निधीमधून मागासवर्गीय शेतकऱ्यांना प्लॉस्टीक ताडपत्री वाटप करणेकरिता रक्कम रुपये 1,99,584/- इतका निधी खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मागासवर्गीय शेतकऱ्यांना प्लॅस्टीक ताडपत्री वाटप प्रस्तावांची तपासणी करता परिच्छेदात नमूद 1 ते 16 लाभार्थ्यांच्या प्रस्तावामध्ये पुढीलप्रमाणे उणिवा आहेत. (अ) जातीचा दाखला सन 2015-2016 मधील (ब) उत्पन्नाचा दाखला सन 2015-2016 मधील (क) ग्रामसभा निवडीच्या पत्रावर दिनांक नाही. (ड) रहिवासी दाखला सन 2015-2016 चा (इ) ग्रामपंचायतचा ग्रामसभा ठराव दिनांक 21/05/2015 चा (ई) लाभ न घेतलेचा दाखला सन 2015-2016 मधील (फ) 8 अ उतारा सन 2015-2016 मधील तसेच काही लाभार्थ्यांचे रेशनकार्ड, ओळखपत्र, उत्पन्नाचा दाखला, ग्रामपंचायत ठराव प्रस्तावासोबत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त 3 मंत्रालय मुंबई,दिनांक 20/06/2008 नुसार वैयक्तीक लाभाच्या योजना कोटेकोरपणे राबविणेबाबत परिशिष्ट 'ई' मधील वेळापत्रकानुसार न राबविता प्रशासकीय मान्यता दिनांक 13/02/2015 रोजी घेण्यात आल्याने योजनेचा उद्देश सफल झालेला नाही.

3) एकूण प्राप्त 63 ताडपत्री नगापैकी 56 नगाचे वाटप केले आहे. 7 नग विनावाटप राहिल्याने साहित्य वाटप ज्या त्या वित्तीय वर्षात करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न केल्याने रक्कम रुपये 22,176/- नाहक गुंतून पडली आहे.

**4.481 ताडपत्री खरेदीबाबत. (100 टक्के अनुदान उपकर निधी).**

**पंचायत समिती गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 22) -** पंचायत समिती गडहिंग्लज, समाजकल्याण विभागाने उपकर निधीमधून ताडपत्री खरेदी करिता रक्कम रुपये 540270/- इतका खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट को. ऑप कंझ्यूमर्स फेडरेशन लि. मुंबई विभागीय कार्यालय नाशिक, यांचेकडून दरकरार म्हणून सादर केलेला Annexure 1 व Annexure 11 लेटर हेडवर जा.क्र.95/2014-2015, दिनांक 07/07/2014 अन्वये सादर केलेला असून शासनाशी दरकरार करण्यात आलेला नाही.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखंस/1088/ 2512/36,दिनांक 02/01/1992 अन्वये अभियांत्रिकी महाविद्यालय कडून पुरवठा झालेल्या साहित्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डीपीआर/1088/ सीआर 786, दिनांक 26/11/1989 नुसार साहित्य वाटप हे त्या त्या वर्षात करणे आवश्यक असताना दिनांक 31/03/2015 अखेर 13 नग वाटपाचे शिल्लक असल्याने प्रती नग रक्कम रुपये 3,915/- प्रमाणे रक्कम रुपये 50,895/- नाहक गुंतून पडलेले आहेत.

4) ताडपत्री वाटपाबाबत काही लाभार्थ्यांची पोहोच पावती/जडसंग्रह नोंदवहीस साहित्य प्राप्तची स्वाक्षरी नाही.

5) लाभार्थी उत्पन्न अट रक्कम रुपये 32,500/- असताना 24 लाभार्थ्यांचे दाखले उपलब्ध नाहीत अथवा उत्पन्न अटीपेक्षा जास्त आहे.

6) आठ लाभार्थ्यांचे प्रस्ताव लेखापरीक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध झाले नाहीत.

**4.482 20 टक्के राखीव निधीतून मागासवर्गीय महिला व 3 टक्के अपंग पुरुष लाभार्थ्यांना शिवणयंत्रे खरेदी करुन वाटपाबाबत.**

**पंचायत समिती आजरा, जिल्हा कोल्हापूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 18) -** पंचायत समिती आजरा, यांनी 20 टक्के राखीव निधीतून मागासवर्गीय महिला व 3 टक्के अपंग पुरुष लाभार्थ्यांना शिवणयंत्रे पुरवणेकरिता रक्कम रुपये 2,58,334/- इतका खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 प्रमाणे वैयक्तीक लाभाच्या योजनांचे अंमलबजावणी परिशिष्ट "ई" मधील वेळापत्रकानुसार राबविलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1020/ प्र.क्र1438,दिनांक 09/02/2001 नुसार 31 जुलै अखेर लाभार्थी निवड करुन साहित्य वाटप 31 जानेवारी अखेर पूर्ण करणे आवश्यक असताना सदर योजनेसाठी लाभार्थी निवड यादी नस्तीसोबत नसल्याने राबविलेली योजना संपूर्णपणे निरर्थक असून लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

3) लाभार्थी उत्पन्न मर्यादा रक्कम रुपये 50,000/- असताना श्रीम. लता अर्जून कांबळे यांच्या प्रस्तावासोबत उत्पन्न दाखला रक्कम रुपये 57,000/- असल्याने दिलेला लाभ अनुज्ञेय नाही. रक्कम रुपये 3,491/- वसुल होणे आवश्यक.

4) शिवणकाम पूर्ण केलेबाबत प्रमाणपत्र 2 लाभार्थ्यांच्या प्रस्तावासोबत नसल्याने दिलेला लाभ अयोग्य असून रक्कम रुपये 6,982/- वसूल होणे आवश्यक.

5) दरकराराप्रमाणे हमी कालावधी एक वर्ष असून शिवणयंत्र सुरक्षित तसेच काही समस्या नसलेबाबत समाधान करणे आवश्यक याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणे आवश्यक.

6) सदरचे साहित्य वाटप झालेनंतर त्यांची त्रयस्थ संस्थेमार्फत खात्री करुन लाभार्थ्यांचा आर्थिक स्तर उंचावलेबाबत तपासणी अहवाल आवश्यक आहे.

7) लाभार्थी प्रस्तावासोबत जोडलेल्या करारपत्रावर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे.

8) साहित्य प्राप्त बाबतचे डिलिव्हरी चलन उपलब्ध नाही. प्राप्त साहित्यापैकी 71 नग वाटप व 3 नग शिल्लक राहिल्याने रक्कम रुपये 10,473/- नाहक गुंतून पडली आहे.

9) शिवणयंत्राची तपासणी शासकीय तंत्रनिकेतन संस्थेकडून करुन घेणे आवश्यक आहे.

**4.483 दलीत वस्ती सुधार योजना मधील झालेल्या बांधकाम खर्चातील अनियमीतता. (शासकीय निधी)**

**पंचायत समिती वरुड, जिल्हा अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** पंचायत समिती अंतर्गत सन 2014-2015 मध्ये अनुसूचीत जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे या योजनेवर रक्कम रुपये 98,64,199/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बांधकामाच्या मुळ मोजमाप पुस्तीका लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आल्या नाही.

2) कामाचे प्रशासकीय व तांत्रीक मंजुरी आदेश प्रस्तावासोबत आढळून आले नाही.

3) कामाच्या जागी कोनशिला बसविण्यात आल्याबाबत दस्तएवज लेखापरीक्षणास आढळून आले नाही.

4) नियमाप्रमाणे कामाची तपासणी बाहेरील जिल्हयातील विशेष समाजकल्याण अधिकारी,संचालक समाजकल्याण व शासनस्तरावरुन केल्याबाबत दस्तएवज लेखापरीक्षणास आढळून आले नाही.

5) बांधकामावर वापरण्यात आलेल्या गौणखनिजावर स्वामीत्व धनाची कपात करण्यात आली नाही.त्यामुळे शासन महसुलाचे नुकसान झाले आहे.खुलासा करावा.

6) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194(क) प्रमाणे आयकराची कपात करण्यात आली नाही.

**4.484 अनुसूचीत जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे कामाच्या खर्चातील अनियमीतता. (शासकीय निधी)**

**पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर, जिल्हा अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर यांना सन 2014-2015 मध्ये अनुसूचीत जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजने अंतर्गत रक्कम रुपये 2,39,97,926/- इतके अनुदान प्राप्त झाले असून रक्कम रुपये 2,83,74,526/- इतका खर्च झाला आहे.सन 2013-14 वित्तीय वर्षातील अखर्चीत रक्कमेची माहीती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. त्यामुळे रक्कम रुपये 43,76,600/- जादा खर्च झाल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सामाजीक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक दवसु 2011/प्र क्र 442/अजाक, दिनांक 05/12/2011 मधील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे कामे केल्याचे आढळून आले नाही.

2) मोजमाप पुस्तीकेत दिनांकीत मोजमापे व वापरलेल्या साहित्याचे गोषवारे नोंदविल्याचे दिसून आले नाही.

3) गौणखनीजाच्या रकमा कपात करण्यात आल्या नाही, त्यामुळे शासकीय महसुलाची हानी झाली आहे.

4) रक्कम प्राप्त झाल्याबाबत ग्रामपंचायतीची पावती नमुना क्रमांक 7 लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही.

5) काम पुर्णत्वाचे दाखले व उपयोगीता प्रमाणपत्र महालेखाकार व शासनास सादर केल्याचे आढळून आले नाही.

6) सक्षम प्राधीकारी यांची मंजुरी न घेता रक्कम रुपये 23,329/- अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा जादा खर्च करण्यात आला.

7) बांधकामावर वापरण्यात आलेले साहीत्य योग्य गुणवत्तेचे वापरल्याबाबत शासकीय प्रयोगशाळेचे चाचणी अहवाल लेखापरीक्षणास आढळून आले नाही.

8) पाळा व महात्मा फुले मागास वस्ती नांदगाव खंडेश्वर येथील सिमेंट कॉक्रीट रस्त्याची कामे मुदतीत पुर्ण करण्यात आली नाही.सदर कामास मुदतवाढ दिल्याचे दिसून आले नाही तसेच कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली नाही.

9) करारनाम्यावर गट विकास अधीकारी यांची स्वाक्षरी नाही.

10) सदर कामाचे देयकातून गौणखनीज रुपये 6992,विमा रुपये 16877, उपकर रुपये 16877, आयकर रुपये 38,761/-, विक्रीकर रुपये 41,757/- व सुरक्षा ठेव रुपये 62,636/- असे रक्कम रुपये 1,83,900/- कपात करण्यात आले नाही.

11) धानोरा गुरव येथील कामाची मुळ मोजमाप पुस्तीका लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

**4.485 सुवर्ण महोत्सव योजनेअंतर्गत अनुसूचीत जाती व नवबौद्ध घटकातील कुटुंबांना शौचालय बांधकामातील अनियमीतता. (शासकीय निधी)**

**पंचायत समिती धामणगाव रेल्वे, जिल्हा अमरावती, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 32) -** पंचायत समिती धामणगाव यांनी सुवर्ण महोत्सव योजनेअंतर्गत अनुसूचीत जाती व नवबौद्ध घटकातील कुटुंबांना शौचालय सुविधा उपलब्ध करुन देणे या कामावर सन 2014-2015 मध्ये रक्कम रुपये 11,22,975/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मंजुर कामापैकी 125 वैयक्तिक शौचालय व 54 खाजगी नळ जोडनीचे काम पूर्ण झाल्याचे नमुद केले आहे मात्र याबाबत कोणतेही अधिकृत अभिलेखे दप्तरी उपलब्ध नाहीत. 220 शौचालय व 253 खाजगी नळ जोडणीची कामे पुरेसा निधी उपलब्ध असुनही दिनांक 31/03/2015 पर्यंत अपूर्ण होती.

2) पंचायत समितीकडे ग्रामपंचायतीचे प्रस्ताव,योजनेमध्ये समाविष्ठ असलेली सर्व कुटुंबे अनुसूचीत जाती व नवबौद्ध घटकातील असल्याबाबत प्रमाणपत्र तसेच लोकवर्गणी बँक खात्यात जमा करण्यास तयार असल्याबाबत ग्रामपंचायतीचे ठराव इत्यादी अभिलेखे उपलब्ध झाले नाही.

3) ग्रामपंचायतीची शौचालय बांधकामाची मोजमाप पुस्तीका लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

4) पूर्ण झालेल्या कामाचे उपयोगीता प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

**4.486 जिल्हा परिषद योजनेचे साहित्य वाटप न करता शिल्लक पडून राहणेबाबत.**

**पंचायत समिती मुर्तिजापूर, जिल्हा अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 40) -** पंचायत समितीचे साठा पुस्तकाची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2009-10 ते 2011-12 या कालावधीमध्ये प्राप्त झालेले साहित्य पंचायत विभागाचे साठा पुस्तकानुसार 100 टक्के अनुदानावर असलेल्या योजनांचे साहित्य लाभार्थ्यांना पत्रव्यवहार न केल्याकारणाने वाटपा अभावी पडून राहीले आहे.

2) सन 2014-15 मध्ये पंचायत समिती साठा पुस्तकात एकुण 2405 टिनपत्रे प्राप्त असुन 2130 वाटप केले. 275 टिन शिल्लक असतांना 198 नग चोरीला गेले व केवळ 77 नग शिल्लक राहिले तरी सबब साठा पुस्तकात नोंद नाही.

3) साहित्य ज्या वित्तीय वर्षात खरेदी केले त्याच वर्षात वाटप करणे आवश्यक आहे. परंतु तशा प्रकारे कार्यवाही केल्याचे आढळत नाही. त्यामुळे सदर योजनेची फलश्रुती झाली नाही.

**4.487 मागासवर्गीयांना 100 टक्के अनुदानावर ताडपत्री पुरविणे.**

**पंचायत समिती मालेगाव, जिल्हा वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती उपकर निधीमधून 100 टक्के अनुदानावर मागासवर्गीयांना ताडपत्री वाटप योजना राबवितांना खालील अनियमितता झालेली आहे.

1) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446 वित्त-09 दिनांक 20/06/2008 चे परिशिष्टानुसार वेळापत्रकाप्रमाणे योजना राबविण्यात आली नाही.

2) मास्टर रजिस्टर ठेवले नाही.

3) साठा नोंदवही वर साठा प्राप्त झाल्याची दिनांकाची नोंद घेण्यात आली असून चाचणी अहवालावर दिनांक नमुद नसल्यामुळे साहित्य प्राप्त झाल्यावर साहित्याची चाचणी झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

4) पुरवठा आदेशानंतर लाभार्थी निवड करण्यात आली आहे.

5) लाभार्थी यादीवर गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, पंचायत सभापती यांची दिनांकीत स्वाक्षरी नाही.

6) उपलब्ध लाभार्थी अर्जाची छाननी केल्यानंतर एकाच कुटुंबातील गजानन पुंडलिक माने, विजय पुंडलिक माने, पुंडलिक खंडुजी माने यांना लाभ दिला आहे. त्यामुळे उपरोक्त तीन पैकी दोन लाभार्थी लाभाची रक्कम रुपये 3801.6 X 2 = 7603.2/- वसुल करण्यात यावी.

7) लाभार्थी यादीमध्ये दत्तात्रय निवृत्ती वानखडे यांचे नाव नसतांना लाभ रक्कम रुपये 3801.6/- वसुल करणे आवश्यक आहे.

**4.488 90 टक्के अनुदानावर मागासवर्गीय अल्पभुधारक शेतकऱ्यांना ताडपत्री पुरविणे.**

**पंचायत समिती कारंजा, जिल्हा वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती कारंजाने पंचायत समिती उपकर योजनेतून 90% अनुदानावर मागासवर्गीय अल्पभुधारक शेतकऱ्यांना ताडपत्री पुरविणेबाबत योजना राबविली याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक जिपअ/2008/प्र.क्र.44/वित्त-9 दिनांक 20/08/2008 अन्वये परिशिष्ठ 3 च्या तरतुदीनुसार वेळापत्रकाचे पालन केले नाही.

2) पुरवठा आदेशावर पुरवठा कोणत्या दिनांकापर्यंत करावा नमूद नाही.

3) लाभार्थी निवड यादीवर गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, पंचायत समिती सभापती यांची दिनांकीत स्वाक्षरी नाही.

4) सदर योजना अल्पभुधारक मागासवर्गीय शेतकऱ्यांसाठी आहे. परंतु श्री.वसंता रामदास पवार, रा.मांडवा, श्री.गुलाब मंजीराम मेश्राम, रा.तारखेडा, श्री.अमोल जानराव कराळे, रा.कामरगाव यांचेकडे 2 हेक्टर पेक्षा जादा शेती क्षेत्र असल्याने ते अल्पभुधारक ठरत नाहीत. त्यांना दिलेला लाभ रुपये 11,403/- वसुल करण्यात यावा.

5) लेखापरिक्षण पर्यंत 54 ताडपत्रीचे वाटप शिल्लक असल्याचे साठा नोंदवहीवरुन आढळते. लाभार्थी निवड यादीनुसार वाटप न करता ताडपत्री शिल्लक ठेवल्याने योजना पुर्ण फलश्रृत झालेबाबत खात्री करता आली नाही.

6) लाभार्थींना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याची नोंद लाभार्थी निहाय व गाव निहाय मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही.

**4.489 दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत बांधकाम खर्चातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती पुसद, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4)** - दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत रक्कम रुपये 13,86,059/- खर्च झाला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, परीपत्रक क्रमांक 3/4/5169,दिनांक 09/01/1987 अन्वये बांधकामात रेती, गिटटी यांचा वापर करण्यापूर्वी शासकीय प्रयोग शाळेतून साहित्य चाचणी करुन घेणे बंधन कारक असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक 10/109/209,दिनांक 11/02/2010 अन्वये वापरलेल्या गौण खनिजावर स्वामित्वधनाची रक्कम रुपये 6,653/- वसुल करणे आवश्यक असतांना वसुल करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक 324/इमारती2,दिनांक 03/03/2006 नुसार मुल्यवर्धीत कर अधिनियम अंतर्गत नोंदणी न झालेल्या कंत्राटदाराकडून 5 टक्के व्हॅटची रक्कम वसुल करण्यात आलेली नाही. वसुल करुन योग्य लेखाशिर्षात जमा करावी.

4) कंत्राटदाराने काम सुरु करण्यापुर्वी व झाल्यानंतर कामाचे रंगीत फोटो काढुन अंतिम देयकासोबत सादर करणे अनिवार्य असून सादर केले नाही.

5) लेखासंहिता नियम 97 व 197 अन्वये नमुना क्र.40 व 69 मध्ये कामाची नोंदी आढळून आली नाही.

**4.490 आर्थीक दुर्बल घटकातील लाभार्थ्यांना टिनपत्रे पुरविण्याकरीता खरेदी खर्चातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती दिग्रस, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** आर्थीक दुर्बल घटकातील लाभार्थ्यांना टिनपत्रे पुरविण्याकरीता रक्कम रुपये 1,24,390/- ची खरेदी करण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परीपत्रक क्रमांक परांस-1084/सीआर- 1633/57 मंत्रालय, मुंबई 32, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थ्यांकडून मागविलेल्या अर्जाची छानणी करुन पात्र लाभार्थ्यांची यादी नुसार लोकवर्गणी जमा करणे आवश्यक असतांना लोकवर्गणी जमा करुन न घेता योजना कार्यान्वित करण्यात आली.

2) पंचायत समितीच्या मासिक सभेत निवड केलेल्या लाभार्थी यादीला मान्यता घेणे आवश्यक होते परंतू मान्यता न घेता लाभार्थ्यांना टिनपत्रेचा लाभ देण्यात आला.

3) लाभार्थ्यांना टिनपत्राचा लाभ दिल्यानंतर लोकवर्गणी जमा करण्यात आली.

4) रक्कम रुपये 50,000/- च्या वरील खरेदी असल्यामुळे वृत्तपत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे आवश्यक असतांना दरपत्रके मागवून टिनपत्रे खरेदी करण्यात आली.

5) लाभार्थ्यांच्या अर्जावर दिनांक नमुद नाही.

6) योजनेचा लाभ रक्कम रुपये 25,000/- उत्पन्न असलेल्या लाभार्थ्यांना देणे आवश्यक असतांना रक्कम रुपये 25,000/- वरील लाभर्थ्यांना लाभ देण्यात आला. (7 लाभार्थी)

7) लाभार्थ्याकडून वसुल केलेली रक्कम फर्मला प्रदान करणे आवश्यक असतांना 11 संकीर्ण या शिर्षाखाली जमा केल्याचे निर्दशनास येते.

8) युनुस करीम व अजमल युनुस कृषि केंद्र हे दोन्ही एकाच विक्रेत्याचे असतांना वेगवेगळे दरपत्रके घेतले आहे. यावरुन शासनाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट होते.

**4.491 17- समाजकल्याण विकास अंतर्गत 100 टक्के अनुदानावर टिनपत्रे वाटप योजना खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती दारव्हा, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12)** - 100 टक्के अनुदानावर टिनपत्रे वाटप योजनेवर रक्कम रुपये 2,63,320/- खर्च नोंदविण्यात आला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/वित्त-6,दिनांक 20/06/2008 नुसार लाभार्थीची निवड दिनांक 31 मे अखेर पर्यंत करुन प्रत्यक्ष लाभ 30 मे पर्यंत देण्याबाबत कार्यवाही केली नाही.

2) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक झेडपीए/2000/प्र.क्र. 27/33 मुंबई 32, दिनांक 05/09/2000 अन्वये रक्कम रुपये 50,000/- चे वरील साहित्य खरेदी करीता दोन लखोटा पध्दतीचा अवलंब केला नाही.

3) पुरवठादाराचे देयकातून 2 टक्के आयकर व सरचार्ज रुपये 5,793/- व विक्रीकर रुपये 5,266/- असे एकुण रक्कम रुपये 11,059/- वसुल करणे आवश्यक आहे.

4) एकुण 227 नगा पैकी 51 टिनपत्रे वाटपा अभावी साठा पुस्तीकेत शिल्लक असुन मागणी अर्ज प्राप्त नसतांना व लाभार्थी निवड न करता योजना राबविली असल्याने रक्कम रुपये 59,160/- निष्फळ खर्च करण्यात आला आहे.

5) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 अन्वये गुणवत्तेचा चाचणी अहवाल उपलब्ध झाला नाही.

6) लाभार्थ्यांना टिनपत्रे पुरवल्यानंतर विनियोगाचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त नाही व मास्टर नोंदवहीवर लाभार्थीच्या नोंदी घेतल्या नाही.

**4.492 17 सामुहिक विकास अंतर्गत 90 टक्के अनुदानावर जिल्हा परिषद सेस निधीतून लोखंडी चाकजोडी पुरविणे खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती पांढरकवडा, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** 90 टक्के अनुदानाव जिल्हा परिषद सेस निधीतून लोखंडी चाकजोडी पुरविणे योजनेअंतर्गत रुपये 99,000/- खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परीपत्रक क्रमांक परांस-1084/सीआर-1633/57 मंत्रालय, मुंबई 32,दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थ्यांकडून मागविलेल्या अर्जाची छानणी करुन पात्र लाभार्थ्यांची यादी नुसार लोकवर्गणी जमा करणे आवश्यक असतांना लोकवर्गणी जमा करुन न घेता योजना कार्यान्वित करण्यात आली.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमाक पंरास/1096/प्रक्र 178/5,दिनांक 07/10/1997 नुसार साहीत्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात होणे आवश्यक होते. 14 पैकी 03 लाभार्थ्यांना वाटप झालेले होते. लेखापरीक्षण कालावधी पर्यंत लाभार्थी निवड सुध्दा केलेली नसल्याचे आढळुन आले. योजनेची फलश्रृती झाली नाही.

3) मेसर्स. जनता फर्निचर मार्ट, पांढरकवडा यांचेकडून रुपये 7,850/- दराने चाकजोडी खरेदी करण्यात आली, त्याच पुरवठा दाराकडून त्याच आर्थिक वर्षात त्याच वर्गणीची लोखंडी चाकजोडी रुपये 7,000/- दराने पंचायत समिति सेस मधुन खरेदी केली. एकाच पुरवठादाराच्या दरामध्ये रुपये 850/- प्रमाणे तफावत असून (1,40,108 / 850 = 11,900) रुपये 11,900/- वसुलपात्र ठरते.

4) चाकजोडी तीन महिने विलंबाने पुरवठा केली असून दंडात्मक कार्यवाही केली नाही.

5) 14 चाकजोडी रुपये 7,850/- प्रमाणे रुपये 1,09,900/- होत असुन 90 टक्के अनुदानाची रक्कम 98,910/- प्रदान करणे आवश्यक असतांना 99,000/- प्रदान केल्याने रुपये 90/- जादा प्रदान वसुलपात्र ठरते.

6) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, मत्सव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक विघयो/1553/116/A/दिनांक 17/08/2013 मधील परिशिष्ट दोन अन्वये कृषी उदयोग विकास महामंडळामार्फत खरेदी न करता स्थानिक बाजारपेठेतुन खरेदी करण्याचे प्रयोजन काय ?

7) पुरवठादाराच्या देयकातुन आयकर व विक्रीकर रक्कम कपात करुन शासनखाती भरणा न केल्याने शासन महसुली नुकसान झाले.

8) वाटप केलेल्या 3 लाभार्थीच्या चाकजोडया वापरात असल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त नाही.

**4.493 90 टक्के अनुदानावर मागासवर्गीयांना टीनपत्रे खरेदी करणे खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिती आरणी, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7)** - 90 टक्के अनुदानावर मागासवर्गीयांना टीनपत्रे खरेदी करणे योजने अंतर्गत रक्कम रुपये 4,94,010/- खर्च झाला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परीपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/ वित्त 9,दिनांक 20/06/2008 नुसार योजना ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार राबविण्यात आली नाही.

2) पुरवठा केलेल्या साहित्याचे डीलीव्हरी मेमोवर क्रमांक व दिनांक नमुद नाही.

3) साहित्याचे वजन श्री गायत्री ईलेक्ट्रीकल्स धरमकाटा, बोरगाव रोड आर्णि, येथे दिनांक 13/05/2015 रोजी करण्यात आले असून टीनपत्रे चे नेट वजन 7,100 किलो भरल्याची पावती आहे. करारातील अटीनुसार प्रति टीन 14 किलो प्रमाणे 550 नगाचे वजन 7,700 किलो असणे अपेक्षीत असतांना 600 किलो कमी वजन भरले. त्यामुळे रक्कम रुपये 42,914/- रुपये वसुलपात्र ठरते.

4) पुरवठा आदेशातील विहीत मुदतीत टीनपत्र्यांचा पुरवठा करण्यात न आल्याने दंडात्मक कार्यवाही करणेत आलेली नाही.

5) 10 टक्के लाभार्थी हिस्सा भरणा केल्याबाबत चलान प्राप्त झाली नाही.

6) वाटपा अभावी 75 नग शिल्लक आढळले.

7) साठा नोंदवही नस्ती नंबर 33 मध्ये नोंदी न घेताच टीनपत्र्यांचे वाटप करणेत आलेले आहे.

**4.494 पंचायत समिती अंतर्गत मागासवर्गीय लाभार्थ्यांना शिलाई मशिन पुरविणे.**

**पंचायत समिती झरीजामणी, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4)** - मागासवर्गीय लाभार्थ्यांना शिलाई मशिन पुरविणे योजनेअंतर्गत रक्कम रुपये 1,50,000/- खर्च करण्यात आला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती स्तरावर लाभार्थी निवड करतांना योजनेसाठी निर्धारीत केलेल्या आदेशातील अटी व शर्तीनुसार लाभधारकांचे अर्जांची छाननी न करता मंजुरी देण्यात आलेली आहे.

2) लाभार्थ्यांनी अर्जासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्रांची पडताळणी केली असता प्रमाणपत्रावर उपरीलेखन करुन त्यांच्या झेरॉक्स प्रति अर्जासोबत सादर करुन बनावट प्रमाणपत्राच्या आधारे लाभ देण्यात आलेला आहे. रक्कम रुपये 10,473/- वसुल होणे आवश्यक आहे.

3) लाभार्थी निवड ग्रामसभेत होणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केल्याची ठरावाची प्रत उपलब्ध झालेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1093/ प्र.क्र.1239,दिनांक 01/09/1993 अन्वये निर्धारीत केलेप्रमाणे मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे दुबार लाभ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) सक्षम प्राधिकाऱ्यांनी लाभार्थी अर्जाची तपासणी / शाहनिशा न करता मोघम स्वरुपात शिलाई मशिन वाटप केल्यामुळे 03 नग*3,491=10,473/- रुपये वसुलीस पात्र ठरते.

**4.495 100 टक्के अनुदानावर भजणी साहित्य वाटप करणे योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती झरीजामणी, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6)** - 100 टक्के अनुदानावर भजणी साहित्य वाटप करणे योजनेअंतर्गत रक्कम रुपये 19,488/- खर्च झाला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दरपत्रकातील साहित्याचे तुलनात्मक तक्ता प्रमाणे स्वतंत्र बाबीच्या नमुद दरानुसार पुरवठा आदेश दिला नसल्यामुळे योग्य बाजारभावाचा लाभ झाला नाही. त्यामुळे 6,950/- रुपये जादा प्रदान झालेले आहे.

2) दरपत्रकात नमुद दरानुसार 09 जोडी टाळची किमंत रक्कम रुपये 5,175/- असतांना उपप्रमाणकान्वये रुपये 10,350/- प्रदान केले. जादा प्रदानाची रक्कम रुपये 5,175/- वसुलपात्र ठरते.

3) कार्यालयीन टिप्पणी व तुलनात्मक तक्ता व दरपत्रकातील दर यामध्ये तफावत दिसून येते.

**4.496 मागासवर्गीय महिलांना 90 टक्के अनुदानावर पिकोफॉल मशिन पुरविणे बाबत. (सेस फंड).**

**पंचायत समिती कामठी, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन दरकरारा नुसार शिलाई मशीन दर रूपये 5497/- असतांना पंचायत समितीने निविदा प्राप्त करून रूपये 5,990/- या दराने 18 नग खरेदी केल्यामुळे रूपये 493 x 18 नग = असे एकूण रूपये 8,874/- जादा प्रदान केले.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 चे 'परिशिष्ट ई' नुसार ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे अमंलबजावणी करण्यात आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.73/74,दिनांक 20/10/1999 अन्वये लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेत करण्यात आलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन पंरास/2010/प्र.क्र.14/24, दिनांक 06/01/2011 अन्वये लाभार्थी हिस्सा वसुल करणेबाबत निर्देश असतांना त्यानुसार कार्यवाही करण्यात आली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे कलम 83(3) नुसार साहित्याच्या गुणवत्तेचे व योग्यतेचे प्रमाणपत्र देण्यात आले नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1082/ 645/266/34, दिनांक 29 जुलै 1989 नुसार योजनेचे मुल्यमापन व फलश्रृती अहवाल नाही.

**4.497 मागासवर्गीय विद्यार्थीनींना 100 टक्के सुटीवर लेडीज सायकल वाटप करणेबाबत. (सेस फंड).**

**पंचायत समिती उमरेड, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजना इयत्ता 1 ली ते 10 वी च्या विद्यार्थ्यांकरीता असतांना 11 वी 12 वी इयत्तेतील विद्यार्थीनींना लाभ दिल्याने 4 सायकलींची किंमत रूपये 21,330/- वसुलपात्र आहे.

2) रूपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा केला नाही.

3) लाभार्थ्यांची मंजूर यादी ठेवण्यात आली नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098/प्र.क्र.73/34,दिनांक 20/10/1999 अन्वये मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 चे 'परिशिष्ट ई' नुसार ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे अमंलबजावणी करण्यात आली नाही.

**4.498 अपंगांना 100 टक्के सुटीवर व्हीलचेअर वाटप करणेबाबत. (सेस फंड).**

**पंचायत समिती उमरेड, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लेखापरिक्षण दिनांकापर्यंत प्राप्त 09 पैकी 08 व्हीलचेअर वाटपाविना पडून असल्याने 6000 x 8 = रुपये 48,000/- रूपये गुंतून पडले आहे.

2) रूपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा केला नाही.

3) लाभार्थ्यांची मंजूर यादी ठेवण्यात आली नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34, दिनांक 20/10/1999 अन्वये मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 चे 'परिशिष्ट ई' नुसार ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे अमंलबजावणी करण्यात आली नाही.

**4.499 अंदाजपत्रकात तरतुद नसतांना 20 टक्के अंतर्गत अनुसूचित जाती जमाती लाभार्थ्यांना 90 टक्के सुटीवर काटेरी तार पुरविणे योजनेतील अनियमितता तसेच अपंगाकरीता 3 टक्के राखीव काटेरी तार पुरविणे योजनेतील अनियमिततेबाबत. (सेस फंड).**

**पंचायत समिती काटोल, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लेखापरीक्षणाच्या वेळी लाभार्थ्यांचे अर्ज उपलब्ध करण्यात आले नाहीत.

2) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक पं.स.का/ 2010/प्र.क्र.- दिनांक 07/01/2001 नुसार लाभार्थी हिस्सा वसुल न करता खरेदी करण्यात आली आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 चे परिशिष्ट ई नुसार विहित कालावधीत योजना राबविण्यात आली नाही.

4) समाज कल्याण विभागाअंतर्गत अनुसूचित जाती जमाती लाभार्थ्यांना 90 टक्के सुटीवर काटेरी तार पुरविणे बाबत सन 2014-15 चे मुळ अंदाजत्रक तसेच सन 2014-15 च्या सुधारीत अंदाजपत्रकात तरतुद मंजूर नसतांना योजना राबवून रूपये 2,45,454/- नियमबाह्य खर्च केल्याचे दिसून येते.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34,दिनांक 20/10/1999 अन्वये मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1082/ 645/266/34,दिनांक 29/07/1989 नुसार योजनेचे मुल्यमापन व फलश्रृती अहवाल नाही.

**4.500 महिलांना 90 टक्के अनुदानावर शिवनयंत्र पुरविणेबाबत. (सेस फंड).**

**पंचायत समिती काटोल, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 चे परिशिष्ट ई नुसार विहित कालावधीत योजना राबविण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पं.स.का/ 2010/प्र.क्र.-, दिनांक 07/01/2001 नुसार लाभार्थी हिस्सा वसुल न करता खरेदी करण्यात आली आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास-1098/प्र.क्र.73/34,दिनांक 20/10/1999 अन्वये लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेव्दारे करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) रूपये 25,000/- पेक्षा जास्त उत्पन्न असनाऱ्या लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1082/ 645/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेचे मुल्यमापन व फलश्रृती अहवाल नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1088/सिआर/716,दिनांक 26/10/1989 नुसार त्याच आर्थिक वर्षात साहित्य वाटप करणे बाबत निर्देश असतांना 22 शिवनयंत्राचे वाटप करण्यात आलेले नाही.

**4.501 90 टक्के अनुदानावर मागासवर्गीय मुला / मुलींना सायकल पुरविणे. (सेस फंड).**

**पंचायत समिती पारशिवनी, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** शासन दर करारानुसार 95 नग लेडीज सायकल खरेदी रुपये 2,94,718/- खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेत झाल्याबाबत ठराव क्रमांक नमुद नाही.

2) शासन दरकरारानुसार लेडीज सायकल दर रूपये 3,096/- असतांना पंचायत विभागाने रूपये 3,447/- या दराने खरेदी केल्यामुळे रूपये 351 x 95 नग = असे एकूण रुपये 33,345/- जादा प्रदानाची रक्कम वसुलपात्र आहे.

3) मागासवर्गीय मुला / मुलींना सायकल खरेदी योजना अंदाजपत्रकात 2 किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावरील विद्यार्थ्यांकरीता असतांना 2 किलोमीटर पेक्षा कमी अंतरावरील 3 विद्यार्थ्यांकरीता केलेला खर्च रूपये 10,341/- वसुलपात्र आहे.

4) पंचायत समिती सेस फंड तसेच जिल्हा परिषद स्तरावरील प्राप्त या दोन्ही सायकलीचे वाटप एकाच विद्यार्थ्यास दोनदा करण्यात आल्याने नियमबाह्य केलेल्या प्रदानाची रक्कम रूपये 3,447/- वसुलपात्र आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक परास 1096/प्र.क्र.178/05,दिनांक 09/10/1997 अन्वये साहित्य आर्थिक वर्षात वाटप करणेबाबत निर्देश असतांना 19 सायकलींचे वाटप करण्यात आलेले नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 चे 'परिशिष्ट ई' नुसार योजना विहित कालावधीत राबविण्यात आली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस/ 1013/प्र.क्र.1239/34, दिनांक 02/09/1993 अन्वये मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1082/ 645/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेचे मुल्यमापन व फलश्रृती अहवाल नाही.

**4.502 अनु.जाती / जमाती व मागासवर्गीय मुलींना 90% अनुदानावर लेडीज सायकल वाटपाबाबत. (पंचायत समिती सेसफंड)**

**पंचायत समिती समुद्रपुर, जिल्हा वर्धा, सन 2014 - 2015 (परिच्छेद क्रमांक 21) -** प्रमाणक क्रमांक 17 दिनांक 31/03/2015 रक्कम रुपये 2,99,700/- लक्ष्मी सायकल स्टोर्स वर्धा 90 नग X 3700 = 3,33,000/- पैकी 90 टक्के रक्कम प्रदान 90 टक्के अनुदानावर अनु.जाती / जमाती व मागासवर्गीय मुलींना 90 नग लेडीज सायकल वाटप करण्याकरिता मे. लक्ष्मी सायकल स्टोर्स वर्धा यांना 90 टक्के रक्कम रुपये 2,99,700/- प्रदान केली आहे.

1) उद्योग संचालनालय, मुंबई यांचे शासन दर करार क्र.SPC/RCT/Bicycle/12/2014-15 /c-383 dated 20/01/2015 मधील schedule I बाब क्रमांक 2 hippo brand ladies cycle completely assembled with bell,single side stand,luggage carrier-medium duty,lock,chain cover quarter प्रकारची लेडीज सायकल खरेदी करण्यात आली आहे, याचे दर schedule II मधील बाब क्रमांक २ प्रमाणे प्रती नग रक्कम रुपये 3096/- आहे. पंचायत समितीने सदर सायकल लक्ष्मी सायकल स्टोर्स वर्धा यांच्याकडून 3700/- प्रती नग प्रमाणे खरेदी केली आहे. तरी शासन दर करारापेक्षा प्रती सायकल रक्कम रुपये 604/- जादा दराने खरेदी करण्यात आली आहे. उपरोक्त देयकातील 90 लेडीज सायकलचे जादा प्रदान रक्कम रुपये 48,924/- लेखा परीक्षणास मान्य करता येत नाही.

2) योजना कार्यान्वित करण्यापूर्वी महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त 09 दिनांक 30/06/2008 नुसार वैयक्तिक लाभाच्या योजनेची अंमलबजावणी काटेकोरपणे राबविण्याबाबत वेळापत्रक ठरवून दिले असून त्यानुसार कार्यवाही न करता अंदाजपत्रकीय तरतुदी नुसार रक्कम खर्ची दर्शविण्यासाठी सन 2014-2015 मध्ये फक्त साहित्य खरेदी करण्यात आले आहे. लाभार्थ्यांना साहित्याचा लाभ हा मार्च 2015 नंतर देण्यात आला आहे. यामुळे ही संपूर्ण योजना सन 2014-2015 मध्ये राबविण्यात आली नाही.

3) सदर योजनाही एका वर्षाकरिता मर्यादित असते, तरी देखील पंचायत समितीने सन 2013-2014 च्या 10 निवड मुलींना सन 2014-2015 मध्ये लाभ दिला आहे. तरी सन 2013-2014 च्या 10 मुलींना लेडीज सायकल वाटपावरील खर्च रक्कम रुपये 33,300/- लेखापरीक्षणास मान्य करता येत नाही.

4) शासन परिपत्रक, ग्रामविकास विभाग, क्रमांक पंरास/1084/सीआर 1633/57 दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्सा प्रथम वसूल करूनच योजना राबविणे आवश्यक असताना या वित्तीय वर्षात लाभार्थी हिस्सा प्राप्त करण्यात आला नाही.

5) पंचायत समितीने गावनिहाय व योजनेनिहाय मास्टर नोंदवही ठेवली नाही.

## 4.503 वृध्द साहित्यिक व कलाकार यांना देय मानधनातील अनियमिततेबाबत.

**पंचायत समिती मोहाडी, जिल्हा भंडारा सन 2014-2015 (परीच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती, मोहाडी तर्फे वृध्द साहित्यिक कलाकरांच्या व त्याच्या वारसदारांना लाभ देतांना रुपये 2,15,000/- खर्च रोखपुस्तकाला नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय दिनांक 07/02/2011 अन्वये या योजनेअंतर्गत मानधन मिळणा-या लाभार्थीचे निधन झाल्यास पत्नीस किंवा त्याच्या पतीस मानधन देतांना दिवंगत लाभार्थ्याचे मृत्युचे प्रमाणपत्र व ते लाभार्थ्याचे वारसदार असल्याबाबतचे तहसीलदार यांचे प्रमाणपत्र गटविकास अधिकारी यांना सादर करणे आवश्यक राहील व कागदपत्राची शहानिशा करुन अतिरिक्त मुख्य कार्यपालन अधिकारी यांच्या मान्यतेस्तव सादर करावा. मान्यतेनंतर त्याचा वारसदारास मानधन अदा करावे असे नमुद आहे. परंतु

1) परसराम आसारामजी मते (मृत्यु प्रमाणपत्र-सरपंच)

2) जानबाजी निमजे (मृत्यु प्रमाणपत्र-पोलीस पाटील)

3) शालीकराम पांडुरंग बुरडे (मृत्यु प्रमाणपत्र-पोलीस पाटील)

4) रमेश सकाराम फुले (मृत्यु प्रमाणपत्र-पोलीस पाटील)

5) गोयालाल भोयर (मृत्यु प्रमाणपत्र- सरपंच)

यांच्या वारसदारांना लाभ देतांना वरील शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही न करता सरपंच व पोलीस पाटील यांचे प्रमाणपत्र घेण्यात आले आहे.

## 4.504 वर्ग 5 ते 12 पर्यंतच्या मागासवर्गीय मुला व मुलींना 85 टक्के सुटीवर दोन चाकी सायकल वाटप करणेबाबत.

**पंचायत समिती लाखांदूर, जिल्हा भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती, लाखांदुर तर्फे जिल्हा निधी सेस फंड योजनेअंतर्गत वर्ग 5 ते 12 पर्यंतच्या मागासवर्गीय मुला व मुलींना 85 टक्के सुटीवर दोन चाकी सायकल रुपये 11,44,811/- चे वाटप करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सायकल खरेदीला प्रशासकिय मंजुरी प्राप्त करुन रुपये 11,44,811/- खर्च करणे आवश्यक आहे. प्रशासकिय मंजुरी ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक - झेडपीए 2012/प्र.क्र. 680, वित्त 9/ दिनांक 31/03/2013 अन्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, भंडारा कडुन प्राप्त करणे आवश्यक आहे. प्रशासकिय मंजुरीची नस्ती उपलब्ध झाली नाही.

2) दरकरारामध्ये जेन्टस सायकल दर प्रती नग रुपये 3,196/- असतांना पुरवठा आदेशात रुपये 3,512/- दर नमुद केले रुपये 316 प्रमाणे 163 नग सायकल साठी रुपये 51,508/- जादा खर्च केला आहे.

3) दरकरारामध्ये लेडीज सायकल दर प्रती नग रुपये 3,096/- असतांना पुरवठा आदेशात रुपये 3,555/- दर नमुद केले रुपये 459 प्रमाणे 161 नग सायकल साठी रुपये 73,899/- जादा खर्च केला आहे.

4) पुरवठा आदेश शर्ती व अट क्रमांक 09 नुसार साहित्य किमतीच्या 3 टक्के सुरक्षा ठेव रुपये 34,344/- जमा केली नाही. तसेच 2.24 टक्के आयकर रुपये 25,644/- देयकातुन कपात केली नाही.

5) लाभार्थी हिस्सा रक्कम रुपये 1,71,721/- चलानद्वारे जिल्हा मध्यवर्ती सह बॅक लाखांदुर येथे जमा आहे.

6) डिलेव्हरी मेमो क्रमांक 01, दिनांक 27/03/2015 नुसार 324 जेंटस सायकल नगाची साठा नोंदवही पान क्रमांक 105 ते 116 आणि लेडीज सायकल पान क्रमांक 117 ते 118 वर नोंद आहे. परंतु सायकल प्राप्तीचा दिनांक डिलेव्हरी मेमो व साठावहीत नमुद नाही.

7) सायकल गुणवत्ता चाचणी अहवाल नसल्याने प्राप्त 324 सायकल च्या गुणवत्तेची पडताळणी करता आली नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र. 446/ वित्त 9 /दिनांक 20/06/2008 अन्वये वैयक्तिक लाभाची योजना विहीत वेळापत्रकानुसार राबविलेली नाही.

9) लेडीज सायकल दर करारनुसार रुपये 3,096/- किमंतीमध्ये चैनकवर चा समावेश असतांना चैनकवर 63 व बास्केट 180 असे एकुण रूपये 243/- प्रमाणे 171 नग सायकल साठी रुपये 39,123/- जादा खर्च केला आहे.

10) सायकल वाटप करतांना लाभार्थीची निवडीचे निकष डावलुन एकुण 42 लाभार्थींची रक्कम रुपये 1,48,622/- चे आर्थिक लाभ देण्यात आलेल्या आहे सदर रक्कम ही वसुलपात्र ठरते.

**4.505 पंचायत समिती उपकराअंतर्गत समाज कल्याण योजने अंतर्गत 100 टक्के अनुदानावर टिनपत्रे खरेदीबाबत.**

**पंचायत समिती कन्नड, जिल्हा औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रंमाक 7) -** पंचायत समिती कन्नड यांनी पंचायत समिती सेस फंडातून 100 टक्के अनुदानावर टिनपत्रे खरेदी करुन समाजकल्याण योजने अंतर्गत ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना प्रती नग रूपये 1,105/- प्रमाणे 272 नग पुरविले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जाहीर निविदेव्दारे खरेदी केलेली नाही.

2) जिल्हा परिषद व पंचाय समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83(3) च्या तरतुदीप्रमाणे साहित्य तांत्रिक दृष्टया योग्य व उपयोगिता दाखले दर्शविले नाही.

3) वैयक्तीक लाभाच्या योजना लाभार्थी निवडी पुर्वीच खरेदीची कार्यवाही केलेली आहे.

4) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक 1098/प्र.क्र.74/34, दिनांक 20/10/1999 मधील तरतुदी प्रमाणे मुद्दा क्रमांक 1.4 (ब) नुसार नोंदवही ठेवलेली नाही.

5) खरेदी साहित्य पुरविल्याचे ठिकाणी पोहचल्यावर त्वरीत निरीक्षण केलेली नाही.

6) लाभार्थ्याच्या अर्जात उत्पन्न प्रमाणपत्र तसेच इतर अनेक त्रुटी असल्याचे दिसुन आले.

7) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र./089/8469/34 दिनांक 29/07/1989 नुसार फलश्रुती अहवाल सादर नाही.

**4.506 दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत केलेल्या कामाबाबत.**

**पंचायत समिती पैठण, जिल्हा औरंगाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती पैठण यांनी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत केलेल्या कामावर रुपये 1,78,14,281/- इतका खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, विक्रीकर अधिसुचना दिनांक 04/04/2012 नुसार कंत्राटदाराचे देयकातुन 5 टक्का मुल्यवर्धित कराची रक्कम कपात न करता देयके अदा केलेली आहे.

2) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) अन्वये 2 टक्के रक्कम आयकर कपात केलेली नाही.

3) विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र दिनांक 02/06/2003 नुसार देयकातुन 1 टक्का विमा रक्कम कपात करुन शासन खाती भरणा केलेली नाही.

4) कामावर वापरलेल्या साहित्याची शासकिय प्रयोगशाळेतुन गुणवत्ता चाचणी केल्याचा अहवाल अंतीम देयकासोबत सादर केलेला नाही.

5) सार्वजनिक बांधकाम नियमावही 1984 मधील परिशिष्ट्र 24 (13 व 15 ) नुसार मोजमाप नोंदी रक्कम प्रदानाच्या वेळेस लाल शाईने क्रॉस केलेले नाही. तसेच कामाची माहिती दर्शविणारा फलक लावलेला नाही.

6) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.झेडपीए-2000/प्र.क्र.44/38, दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामाची स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवली नाही. व लेखा संहिता 1968 चे नियम 67 नुसार नमुना 23 मध्ये काम प्रगतीची नोंदवही ठेवलेली नाही.

**4.507 दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत केलेल्या कामाच्या अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मानवत, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती मानवत च्या सन 2014-15 च्या लेखापरीक्षणात पंचायत समितीने दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत अक्षेपातील तपशिलामध्ये दर्शवल्याप्रमाणे एकूण 12 सिमेंट रस्ता व नाली बांधकामावर रुपये 13,22,380/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9,दिनांक 31/01/2013 मधील टीप 1 व 4 अन्वये पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही केले बाबतचा ठराव दिसुन येत नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 146 अन्वये कंत्राटदारा सोबत करारनामा करणे आवश्यक आहे तथापि अनुक्रमांक 1 ते 4 कामाच्या संचिकेतील करारनामे तपासली असता अनुक्रमांक 3 ते 9, 11 कामाच्या करारनाम्यावर करारनामा लिहुन घेणारे गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या दिसुन आल्या नाहीत. तसेच सर्व करारनाम्यावर दोन साक्षीदाराच्या स्वाक्षऱ्या दिसुन आल्या नाहीत.

3) विवरणपत्रातील अनुक्रमांक 3 सिमेंट रस्ता व नाली सोनुळा या कामाची संचिका व मोजमाप पुस्तिका तपासली असता अंदाजपत्रकात सिमेंट रस्ता 133 मीटर (रुपये 2,87,360/-) व नाली 133 मीटर (रुपये 1,10,794/-) काम करणेचे प्रस्तावित असताना प्रत्यक्षात मात्र नाली बांधकाम न करता सिमेंट रस्ता 134 मीटर केलेला असुन खर्च मात्र अंदाजपत्रकाएवढा नोंदविला आहे. तसेच संचिकेत कमी जादा खर्चाचे विवरणपत्र (कारणासह) जोडलेले नाही. तसेच सदरील बदलास सक्षम तांत्रिक अधिकारी यांचे मंजुरी घेतलेली नाही. त्यामुळे केलेली कार्यवाही नियमबाह्य असुन लेखासंहिता 1968 चे नियम 118 चे उल्लंघन झालेले आहे.

4) विवरणपत्रातील अनुक्रमांक 11 सिमेंट रस्ता व नाली बांधकाम किन्होळा बुद्रूक या कामाची संचिका व मोजमाप पुस्तिका क्रमांक 3079 तपासली असता सदर कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक 23/03/2015 रोजीचे असुन मोजमाप पुस्तीकेवर (पृष्ठ क्रमांक 20, 21) कामाचे अंतिम मुल्यांकन दिनांक 16/04/2015 रोजी नोंदविलेले आहे. तथापि लेखा विभागाने मात्र देयक काम पुर्ण होणे अगोदरच दिनांक 26/03/2015 रोजी पारित करुन ग्रामपंचायत किन्होळा बु. ला रक्कम रुपये 1,29,761/- प्रदान केलेली आहे. तरी लेखासंहिता 1968 चे नियम 37(1) व 186(2) चे प्रकाशात हि बाब नियमबाह्य आहे.

5) महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक गौखनि-1009/ प्र.क्र. 309/ख(3),दिनांक 11/02/2010 अन्वये कामावर वापरण्यात आलेल्या गौण खनिजातुन स्वामित्व धनाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे. तथापि तपशीलातील पाच कामाच्या देयकातुन रुपये 6,861/- स्वामित्व धनाच्या रककमा कमी कपात केलेल्या आहेत. सबब कमी कपात केलेली रक्कम रुपये 6,861/- संबंधित ग्रामपंचायतीकडुन वसुल करणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर अधिनियम 2002 तसेच महाराष्ट्र शासन, राजपत्र दिनांक 04/04/2012 अन्वये 01/04/2012 पासुन मुल्यवर्धीत कराची 5 टक्के रक्कम देयकातुन कपात करणे आवश्यक असताना पंचायत समितीने 5 टक्के रक्कम रुपये 1,57,567/- वसुल केली नाही.

7) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194(क) प्रमाणे देयकातुन 2 टक्के आयकराची रक्कम वसुल करणे आवश्यक असताना पंचायत समितीने 2 टक्के आयकराची रक्कम रुपये 74,506/- कपात केलेली नाही.

8) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमाप-1098/प्र.क्र.28, दिनांक 19/08/1998 अन्वये कंत्राटी कामाच्या मुल्याच्या 1 टक्के दराने कामाचा विमा उतरविणे आवश्यक आहे. परंतु कामाची विमा रक्कम रुपये 30,196/- देयकातुन कपात केलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-2009/प्र.क्र.123/परा-7, दिनांक 30/10/2009 अन्वये तपशिला मध्ये दर्शवलेल्या बारा कामांच्या देयकातुन 1 टक्के कामगार उपकराची रक्कम रुपये 30,196/- कपात केलेली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार कामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची तांत्रिक मापदंडानुसार गुणवत्ता तपासणी अहवाल देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. त्या शिवाय देयके पारीत करु नयेत असे स्पष्ट निर्देश असताना विवरणपत्रातील नमूद सहा कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचा गुणवत्ता तपासणी अहवाल संचिकेत दिसुन आला नाही.

11) जिल्हा परिषदे मार्फत नवीन व दुरुस्तीच्या रुपये 20,000/- व त्या पेक्षा अधिक रक्कमेच्या दर्शक फलक कामाच्या ठीकाणी लावल्या शिवाय देयकाची रक्कम अदा केली जाणार नाही अशा स्पष्ट सुचना असताना विवरणपत्रातील नमूद 6 कामासाठी अंदाजपत्रकात माहिती दर्शक फलक बसविणेची तरतुद असताना देखील फलक बसविला नाही. तसेच काम पुर्ण झाल्यानंतर फलक बसविलेचे दिसुन येत नाही.

12) सिमेंट रस्ता सावरगाव व सिमेंट रस्ता हत्तलवाडी या कामांच्या संचिका लेखापरीक्षणात सादर केल्या नाहीत. तसेच विवरणपत्रातील नमूद 3 कामाच्या मोजमाप पुस्तिका क्रमांक 37, 3103, 3061 या लेखापरीक्षणात सादर केल्या नाहीत त्यामुळे अंदाजपत्रकाप्रमाणे व कामाच्या अटी व शर्तीनुसार काम झाले बाबतचे पडताळणी लेखापरीक्षणात करता आली नाही.

**4.508 समाजकल्याण अंतर्गत 100 टक्के अनुदानावर पीव्हीसी पाईप पुरवठा करणेबाबत.**

**पंचायत समिती हिंगोली, जिल्हा हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती, हिंगोलीने सन 2014-2015 या वर्षात पंचायत समिती उपकरातुन समाजकल्याण योजनेअंतर्गत 100 टक्के अनुदानावर ग्रामीण भागातील मागासवर्गीय शेतक-यांना पीव्हीसी पाईप पुरवठा करणे योजनेवर रुपये 18,60,361/- खर्च नोंदवलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 126 नुसार दरास मान्यता घेतलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/ वित्त-9, दिनांक 19/03/2012 मधील टिप 2 नुसार ज्या विभागाची योजना आहे त्या विभागाच्या पंचायत समिती स्तरावरील अधिका-याचा तांत्रीक सल्ला घेऊनच गट विकास अधिकारी यानी तांत्रिक मान्यता द्यावी परंतु अशी कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्रं.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार वेळापत्रकाबाबत योजनेची अंमलबजावणी केलेली नाही.

4) परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ यांचे दरकरार असताना त्यांचे दर आणि खरेदी दर यातील तफावत रक्कम रुपये 3,08,022/- वसुल करून उपकर खाती भरणा करणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परीपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर/1633/57,दिनांक 19/01/1985 नुसार योजना राबवण्यापुर्वी लाभार्थी हिस्सा जमा केला नाही.

6) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.872/2 ब,दिनांक 10/10/1996 नुसार कोणतीही वस्तु खरेदी करण्यापुर्वी किती वस्तुंची आवश्यकता आहे याचा आढावा घेतलेला नाही.

7) आक्षेपात दर्शविल्याप्रमाणे लाभार्थी नावे सातबारावर आढळून आली नाही, योजनेचा यापूर्वी लाभ न घेतल्याचे प्रमाणपत्र ग्रामसेवक यांनी दिले असुन ते प्रमाणीत नाही, पाणी उपलब्ध असले बाबत प्रमाणपत्र तलाठी यांनी दिले असुन पाण्याचा नेमका स्त्रोत कोणता हे नमुद नाही, 7/12वर सिचंनाचा स्त्रोत आढळुन येत नाही, उत्पन्नाचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकारी ऐवजी तलाठी यांचे आहे, लाभार्थी अर्ज अपूर्ण असून साक्षांकीत केलेले नाहीत.

8) साठा नोंदवहीवर गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच योजनेची मास्टर नोंदवही प्रमाणीत ठेवलेली नाही.

9) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक पीआरसी-1083/सीआर/1074/57,दिनांक 29/07/1983 अन्वये योजनेचा मुळ हेतु सफल झाल्याबाबत सविस्तर पाहणी अहवाल नाही.

**4.509 दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत (2014-2015) सी.सी.रोड व समाजमंदिर कामावर केलेल्या खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती कळमनुरी, जिल्हा हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 14) -** पंचायत समिती, कळमनुरीने दलीत वस्ती सुधार योजनेअंतर्गत परिच्छेदातील विवरणपत्रात नमुद कामांवर रक्कम रुपये 15,34,729/- खर्च नोंदवलेला आहे. सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु-2008/ प्र.क्र.524/विघयो-1,दिनांक 14/11/2008 नुसार दलित वस्तीची विकास कामे घेण्यापुर्वी बृहत आराखडा स्थानिक परिस्थिती व गरज लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने बनवुन त्यास विशेष जिल्हा समाजकल्याण अधिका-यांची मान्यतेबाबत अभिलेखे उपलब्ध केले नाहीत.

2) ग्रामसेवकाने खात्यातुन या योजनेचा निधी काढताना ग्रामपंचायतींची मंजुरी / ठराव घेऊनच निधी काढण्याची कार्यवाही करावयाची असुन झालेला जमा खर्च ग्रामपंचायतीस दर्शविणे आवश्यक असताना अशी कार्यवाही केलेली नाही.

3) प्रशासकीय मान्यतेच्या अटी नुसार काम सुरु करणेपुर्वी प्रस्तावित काम यापुर्वी इतर कोणत्याही योजनेतून झाले नसल्याबाबत, तसेच लोकसंख्येप्रमाणे देय रक्कम व या पुर्वी दिलेली रक्कम आणि प्रस्तुत आदेशामध्ये मंजुर केलेली रक्कम शासन निर्णयाप्रमाणे योग्य असल्याबाबत गटविकास अधिकारी यांनी खात्री केलेली नाही.

4) उपरोक्त दिनांक 14/11/2008 च्या शासन निर्णयानुसार संचालक, समाजकल्याण, पुणे यांनी या योजनेअंतर्गत होणा-या कामाची तपासणी दुस-या जिल्हयाच्या विशेष समाज कल्याण अधिका-यांकडुन करुन घ्यावी तसेच 5 टक्के वस्त्यामधील कामाची तपासणी संचालक, समाजकल्याण पुणे यांच्या मार्फत व 2 टक्के वस्त्यांमधील कामाची तपासणी शासनस्तरावर करणे आवश्यक असताना अशा तपासण्या केलेल्या नाहीत.

5) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक विसा/नियो 1/प्र.क्र.1525/कावी 460,दिनांक 27/07/2010 नुसार दोष निवारण कालावधी मध्ये काम खराब झाल्यास दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबधीत यंत्रनेची असताना याबाबत अभिलेखे दिसून आले नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक विकास-2011/प्र.क्र.217/ पं.रा.8,दिनांक 15/11/2011 मधील परि. 5 नुसार गुणवत्ता तपासणी व कामाच्या दर्जाबाबत कार्यवाही केलेली नाही.

7) कमी कपात आयकर रक्कम रुपये 30,694/- शासन खाती भरणा केली नाही.

8) पुर्ण झालेल्या कामांच्या नोंदी ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवहीत घेतल्याचे अहवाल लेखापरीक्षणात दिसुन आले नाहीत.

9) करारनाम्यावर दिनांक, साक्षीदारांच्या स्वाक्ष-या नाहीत.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 169 नुसार कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांनी मोजमापाच्या तारखा मोजमाप पुस्तिकेत नोंदविल्या नाहीत.

11) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.44/33, दिनांक 22/12/2000 नुसार कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंत्याने काम पुर्ण झाल्यावर मोजमाप पुस्तिकेत काम पुर्णत्वाचा दाखला नोंदविला नाही.

12) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 168(1) नुसार कार्यकारी अभियंता यांनी 5 टक्के तर उपअभियंता यांनी 100 टक्के मोजमापाची तपासणी केलेली नाही.

**4.510 दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध कामाचे खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती वसमत, जिल्हा हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती, वसमतने सन 2014-2015 मध्ये परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे ग्रामपंचायतींना दलित वस्ती सुधार योजनेवर रक्कम रुपये 70,72,573/- खर्च नोंदविला आहे. सदर कामांचे देयकातुन आयकर कपात केला नाही. तसेच कामाचे मुल्यांकनाशिवाय खर्च, मुल्यांकनापेक्षा जादा खर्च नोंदविण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) परिशिष्टातील अनुक्रमांक 24 वरील कामावर मुल्यांकनापेक्षा जादा खर्च रुपये 1,12,500/- केला.

2) परिशिष्टातील अनुक्रमांक 20 वरील कामाच्या देयकातुन गौण खनिजाची रक्कम रुपये 11,784/- कपात केलेली नाही.

3) परिशिष्टात नमुद केल्याप्रमाणे, कामाचे मुल्यांकनाशिवाय कराच्या कपाती न करता प्रदान केले.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 171(2) प्रमाणे कामाचे मुल्यांकन नसतांना परिशिष्ट क्रमांक (06) मध्ये दर्शविले प्रमाणे एकुण रक्कम रुपये 5,25,000/- योजनेच्या लेखा शिर्षकावर खर्च नोंदविण्याची तरतुद नाही. अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्र 39 दिनांक 15/01/2014 प्रशासकीय मान्यतेमधील अट क्रमांक 17 -प्रथम 25 टक्के, दुसरा 50 टक्के, व तिसरा 15 टक्के आणि काम पुर्ण झाल्यावर 10 टक्के रक्कम प्रदान करावी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशा प्रमाणे प्रथम टक्केवारी प्रमाणे अग्रिम मंजुर करून व अग्रिम या लेखाशिर्षाखाली खर्च नोंद करून समायोजना नंतर अंतिम कामाचे मुल्यांकनानुसार खर्च नोंदविणे आवश्यक होते.

5) केंद्रशासन आयकर अधिनियम, 1961 चे कलम 194 (क) प्रमाणे परिशिष्ट क्रमांक (06) मधिल कामावरील खर्चाच्या वरील 2 टक्के आयकर रक्कम रुपये 4,93,762/- कपात केलेला नाही.

6) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक दवसु-2013/प्र.क्र.85,अजाक-01, दिनांक 01/08/2013 नुसार झालेल्या विकासकामाच्या 05 टक्के कामाची तपासणी समाजकल्याण आयुक्त, पुणे व इतर जिल्हयांचे जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी केलेली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 168 प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी कामाच्या मोजमापाची 5 टक्के तपासणी केलेली नाही.

8) विद्युतीकरणाची कामे तांत्रिकदृष्टया सक्षम किंवा नोंदणीकृत विद्युत ठेकेदाराकडुन करून घेणे आवश्यक असताना कामे ग्रामपंचायतींकडुन करुन घेण्यात आलेली आहेत.

**4.511 समाजकल्याण योजनेअंतर्गत मागासवर्गियांना 100 टक्के अनुदानावर सौर कंदिल वाटप करणे बाबत योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती, औंढा ना. यांनी सन 2014-2015 मध्ये समाजकल्याण योजनेअंतर्गत मागासर्गीयांना 100 टक्के अनुदानावर सौर कंदिल वाटप करणे योजनेवर रक्कम रुपये 8,45,100/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 मधील कलम 126 नुसार दरास मान्यता घेतलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2001/प्र.क्र.132/ पं.स.7(26),दिनांक 05/09/2002 नुसार दरकरार अस्तित्वात नसल्याबाबत उद्योग संचालनालय मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेकडून लेखी स्वरुपात खात्री करुन घेणे आवश्यक असताना जुन्या दरकरारावर नियमबाहय खरेदी केलेली आहे.

3) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन परिपत्रक क्रमांक भांखस 2008/प्र.क्र.256/08/उद्योग-4, दिनांक 10/10/2008 नुसार कार्यवाही न करता करारास मुदतवाढ देवून खरेदी केली.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1076/प्र.क्र. 872/जल 2 ब, दिनांक 10/10/1996 अन्वये साहित्याच्या मागणीचा आढावा न घेता खरेदी केली.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशश 1020/प्र.क्र.114/38, दिनांक 09/02/2001 नुसार योजनेची अंमलबजावणी, लाभार्थीची निवड केली नाही. लाभार्थ्याचे नाव, स्वाक्षरी, पोंचपावती नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची अंमलबजावणी केली नाही.

7) लाभार्थी निवडीच्या अटी व शर्ती योजनेमध्ये नमूद केलेल्या नाहीत.

8) महाऊर्जा, पुणे तांत्रीक मंजुरी 2014-15/ सौर/ 75-35,दिनांक 12/08/2014 नुसार सौर कंदिल पुरवठा झाल्याबाबत महाऊर्जा, पुणे कार्यालयास कळविण्यात आले नाही. आवश्यकतेनुसार रँडम पद्धतीने सौर कंदिलाची तांत्रीक तपासणी करण्यात आली नाही.

9) संपुर्ण लाभार्थ्यांचे अर्ज लेखा परीक्षणात उपलब्ध केलेले नाहीत.

10) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी-1093/सीआर/1074/57,दिनांक 29/07/1983 अन्वये योजनेचा उद्देश्य सफल झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही.

11) दरकरारामध्ये अनुक्रमांक 32 दरकरारधारकामध्ये केएसपी इंडस्ट्रीज शिवराम नगर परभणी हे पंचायत समिती औंढा तसेच लगतच्या जिल्ह्यातील जवळचे पुरवठादार असतांना पंचायत समितीने पुरवठादार मे. इलेक्ट्रॉ सोलार सिस्टीम कोरेगाव, तालुका सातारा यांना कोणत्या आधारे पुरवठा आदेश देण्यात आले याबाबत खुलासा केला नाही.

12) दरकरारातील अनुक्रमांक 24 नुसार पुरवठा आदेश देण्यापूर्वी सदरील पुरवठा धारकाचे सर्विस सेंटर जिल्ह्यात असल्याबाबत खात्री करण्यात आलेली नाही.

13) दरकरारातील अट क्रमांक 33 (ए) (II) नुसार पुरवठाधारकाकडुन बँक गॅरंटी न घेता 100 टक्के प्रदान केले.

14) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता, 1968 चे नियम 87 प्रमाणे साहित्याचा चाचणी अहवाल घेतलेला नाही.

15) विलंबाने साहित्य पुरवठ्याबाबत दंडाची रक्कम रुपये 25,353/- गट विकास अधिकारी यांनी वसुल केली नाही.

16) महाऊर्जा दरकरार दिनांक 26/09/2013 मधील अट क्र. 33(ब) चे पालन झालेले नाही.

**4.512 मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर डिझेल इंजीन पुरवठा करणे योजनेतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती सेनगांव, जिल्हा हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती, सेनगावने सन 2014-2015 चे स्वउत्पन्नातून ग्रामीण मागासवर्गीय शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर रुपये 4,80,000/- डिझेल इंजिन खरेदीवर खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 चे कलम 126 नुसार दरास मान्यता घेतलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्रं.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेचे वेळापत्रक पाळले नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारन विभाग, शासन निर्णय क्रमांक परास 1020/प्र.क्र.14/ 38,दिनांक 09/02/2001 नुसार योजनेची अंमलबजावणी परिणामकारक व्हावी यासाठी निविदा बोलावण्यापुर्वी तथा खरेदीपुर्वी लाभार्थीची निवड केलेली नाही. खरेदीनंतर लाभ दिलेल्या शेतकऱ्यांचे पात्रतेबाबत कागदपत्रांचे प्रस्ताव आणि सभेची मंजुरी लेखापरीक्षणात दर्शविले नाही.

4) दर करारातील अटीनुसार पुरवठा संस्थानी औजाराची मागणी नोंदविणा-या क्षेत्रिय अधिकारी यांना औजाराची केंद्रीय तपासणी संस्थाचे तपासणी अहवालाची अथवा बी.आय.एस. प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध करुन घेतली नाही. दर बाजारभावापेक्षा जादा नसल्या बाबत खात्री केलेली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग़, शासन निर्णय क्रमांक मागास-1083/प्र.क्र.1239/ 34, मंत्रालय, मुंबई,दिनांक 01/09/1993 नुसार दुबार लाभ नोंदवही ठेवली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, क्रमांक पीआरसी-1093/सीआर/1074/57, दिनांक 29/07/1983 नुसार योजना फलश्रुती अहवाल घेण्यात आला नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2007/प्र.क्र.4877/वित्त-3,दिनांक 25/06/2014 अन्वये पंचायत समिती अंतर्गत योजना राबविताना अपंगासाठी 3 टक्के निधी राखून ठेवणे आवश्यक असताना योजनेमध्ये अपंग मागासवर्गीय शेतकऱ्यास लाभ दिल्याचे अभिलेखे दर्शविले नाही.

**4.513 दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत केलेल्या कामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती सेनगांव, जिल्हा हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती, सेनगावने सन 2014-2015 मध्ये दलितवस्ती सुधारणा योजना अंतर्गत प्रस्तुत लेखापरीक्षण अहवालासोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार रुपये 20,24,314/- खर्च नोंदविला असुन याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक- दवसु 2008/ प्र.क्र.524/ विघयो 1, दिनांक 14/11/2008 नुसार दलितवस्तीचे विकासकामे घेण्यापुर्वी बृहत आराखडा स्थानिक परीस्थीती व गरज लक्षात घेवुन ग्रामपंचायतीने ठरवावा त्यास विशेष जिल्हा समाजकल्याण अधिका-याची मान्यता घेतल्याचे अभिलेखे दर्शविले नाहीत.

2) ग्रामसेवकाने खात्यातुन या योजनेचा निधी काढतांना ग्रामपंचायतीची मंजुरी/ठराव दर्शविण्यात आला नाही.

3) प्रशासकीय मान्यतेच्या अटीनुसार काम सुरु करण्यापुर्वी प्रस्तावित काम यापुर्वी कोणत्याही योजनेतुन झाले नसल्याबाबत तसेच दलित लोकसंखेप्रमाणे देय रक्कम व यापुर्वी दिलेली रक्कम आणि प्रस्तुत आदेशामध्ये मंजुर केलेली रक्कम शासन निर्णयाप्रमाणे योग्य असल्याबाबत गट विकास अधिकारी यांनी खात्री केल्याचे कोणतेही कागदपत्रे संचिकेत आढळले नाही.

4) उपरोक्त दिनांक 14/11/2008 च्या शासन निर्णयानुसार, संचालक, समाजकल्याण पुणे यांनी या योजनेअंतर्गत होणा-या कामाची तपासणी दुस-या जिल्हयाच्या विशेष समाजकल्याण अधिका-याकडुन करण्यात आल्या नाहीत.

5) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक विसा/ नियो 1/प्र.क्र.1525/कावि 460, दिनांक 27/07/2010 नुसार दोष निवारण कालावधीमध्ये काम खराब झाल्यास दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणेवर राहील याबाबत कार्यवाही दिसुन आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. व्हिपीएम/ 1099/ प्र.क्र.54/8,दिनांक 20/05/1999 नुसार केलेल्या कामाची माहितीदर्शक लोखंडी फलक लावण्यात आले नाही.

7) अनुक्रमांक 3,4,5,6 व 7 चे पथ दिव्याची कामे तांत्रिकदृष्टया योग्य त्याच ठिकाणी केल्याचे मोजमाप पुस्तिकेत नमुद केले नसुन दरकरारानुसार प्रदान योग्य त्या खाती केले नाही.

8) अनुक्रमांक 1 मन्नासपिंप्री सिमेंट रस्ता व नाली कामासह सर्वच कामाचे पुर्वी व काम चालु असतानाचे फोटो नाहीत. साहित्य वापरापुर्वी चाचणी घेतल्याचे अहवाल संलग्न केलेले नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168(1) नुसार कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी कामाची तपासणी केली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 169 नुसार मोजमाप पुस्तिकेत मोजमापाची दिनांकीत स्वाक्षरी अभियंता यांनी केलेली नाही.

11) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 97 नुसार विहीत नोंदवहीत नमुना नंबर 39 व 40 ठेवलेल्या नाहीत.

12) विद्युतीकरणाची कामे मोजमाप नोंदीसाठी शाखा अभियंता, जिल्हा परिषद, परभणी यांना प्राधिकृत केल्याबाबत आदेश दर्शविले नाहीत.

**4.514 दलीतवस्ती सुधार योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या कामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती हदगांव, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती हदगांव सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 16,02,293/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय दिनांक 11/02/2010 अन्वये कामावर वापरण्यात आलेल्या रेती, गिटटी, मेटल व दगड या साहित्यातून स्वामित्व धनाची रक्कम वसूल करणे आवश्यक असतांना मुळ परिच्छेदातील बाब क्रमांक 1 ते 6 व 8 च्या कामातून कमी कपात केलेली रॉयल्टी रक्कम रुपये 10,956/- शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (क) नुसार बांधकामाच्या देयकातून 2 टक्के आयकर रुपये 27,000/- वसूल करण्यात आला नाही. ती वसूल करुन शासनखाती भरणा करणे आवश्यक आहे. (मुळ परिच्छेदातील बाब क्रमांक 9 ते 13).

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विमाप/1098/प्र.क्र.28,दिनांक 19/08/1998 अन्वये कंत्राटी कामाच्या मुल्यांच्या 1 टक्के दराने कामाचा विमा उतरविणे आवश्यक असतांना उपरोक्त कामांच विमा रक्कम रुपये 13,500/- कपात केलेली नाही. कपात करुन रक्कम रुपये 13,500/- विमा संचालनालयाकडे पाठविणे आवश्यक आहे. (अनुक्रमांक 9 ते 13)

4) कामगार कल्याण उपकर अधिनियम 1996 चे कलम 3 (1) व उदयोग, उर्जा व कामगार विभाग महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र. 108/ का-735 दिनांक 17/06/2010 नुसार 1 टक्के कामगार कल्याण उपकर वसूल करुन कामगार कल्याण मंडळाकडे जमा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नाही. कामगार कल्याण उपकराची 1 टक्के रक्कम रुपये 13,500/- वसूल करुन कामगार कल्याण मंडळाकडे भरणा करणे आवश्यक आहे. (अनुक्रमांक 9 ते 13)

5) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र 04/04/2012 अन्वये बांधकामाचे देयकातून मुल्यवर्धित कराची 5 टक्के प्रमाणे सुधारीत दराने रक्कम रुपये 67,500/- वसूली केली नाही.

**4.515 मागासवर्गीय महिलांना शिलाई मशीनचा पुरवठा करणे योजनेतील अनियमिताबाबत.**

**पंचायत समिती लोहा, जिल्हा नांदेड, सन 2012-2013 ते 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती लोहाचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 5,79,562/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे कलम 126 अन्वये मशीन खरेदी प्रतिनग रुपये 3,202/- प्रमाणे प्रतिदरास पंचायत समितीने मान्यता दिलेले ठराव दर्शविला नाही.

2) शिलाई मशीनची खरेदी करतांना प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता मिळाल्यानतंर लाभार्थी निवड, नतंर पूरवठा आदेश देणे आवश्यक असतांना, पूरवठा आदेश अगोदर दिले आहेत.

तसेच साठा नोंदवहीवर नोंद नसल्यामूळे खरेदी केलेल्या शिलाई मशीनची लाभार्थ्यांना वाटप केल्याची खात्री पटू शकली नाही.

3) शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत पातळीवर प्रसिध्दी देवून इच्छूक लाभधारकाकडून अर्ज मागवून प्राप्त अर्जातून अटी व शर्तीची पूर्तता करणा-या लाभार्थीची निवड करुन त्यास पंचायत समितीची मान्यता घेवून लाभ देणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झालेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 83 (3) साहित्य खरेदी करण्यापूर्वी साहित्याची तपासणी करुन योग्य दर्जा असल्याबाबतचे कार्यालय प्रमूखाने योग्यता प्रमाणपत्र दिले नाही.

5) पंचायत समितीने दिलेल्या लाभाचा दुरुपयोग अथवा वस्तूची विक्री करू नये म्हणून रुपये 100/- बंधपत्रावर लाभार्थ्याकडून हमीपत्र घेतले नाही.

6) एकाच लाभार्थ्यास शासन व जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर दुबार लाभ मिळाले नसले बाबतचे पडताळणी करण्यासाठी मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

7) संचिकेत डिलेव्हरी चलन दिसून आले नाही, त्यामूळे साहित्य प्राप्त केंव्हा झाले याबाबत खात्री करता आली नाही.

**4.516 90 टक्के अनुदानावर सायकल खरेदीतील अनियमितता.**

**पंचायत समिती लोहा, जिल्हा नांदेड, सन 2012-2013 ते 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 30) -** पंचायत समिती लोहाने 90 टक्के अनुदानावरील योजनेअंतर्गत सायकल खरेदीवर रुपये 2,76,500/- चा खर्च नोंदला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जल संधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/ प्र.क्र.680/वित्त्त-9,दिनांक 19/03/2012 अन्वये पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रीक मान्यतेची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही केले बाबतचा ठराव दिसुन येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-09 दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हापरीषद व पंचायत समिती स्तरावर योजना राबविण्यासाठी विहित वेळापत्रकानुसार अंबलबजावणी विहित केलेली आहे त्यानुसार प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळाले नंतर व लाभार्थी निवडीची प्रक्रिया सर्वार्थाने पूर्ण करून त्यांचे कडून लोकवाटा/हिस्स्याची रक्कम जमाकरूनच साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश देणे आवश्यक आहे तथापि पंचायत समितीने उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) सदर योजनेस उपरोक्त शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत पातळीवरून प्रसिद्धी देऊन इच्छुक लाभधारकाकडून अर्ज मागवून प्राप्त अर्जातून अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या लाभार्तीची निवड करून त्यास पंचायत समितीची मान्यता घेऊन लाभ देणे आवश्यक होते तथापि, अशी कार्यपद्धती न अवलंबिता जसे जसे अर्ज प्राप्त होतील व पंचायत समिती सदस्यांचे शिफारसी नुसार जसे जसे लाभार्थी प्रस्ताव प्राप्त होतील तसे तसे साहित्य वाटप केल्याचे दिसून येते. त्यामुळे अवलंबिलेली प्रक्रिया वित्तीय औचीत्यास अनुसरून नाही.

4) उपरोक्त शासन निर्णयान्वये लाभार्थी निवड करून त्यांचे कडून लाभार्ती हिस्स्याची रक्कम रुपये 27,650/- अगोदर जमा करूनच साहित्य खरेदी करणे आवश्यक होते परंतु अशी कार्यवाही न करता साहित्य खरेदी नंतर लाभार्थी हिस्स्याची रक्कम वसूल करून साहित्याचे वाटप केलेले आहे. तसेच आजपावेतो रूपये 7,500/- लाभार्थी हिस्सा भरणा केलेले आहे. सदरील बाब नियमबाह्य ठरते.

तेव्हा उर्वरित रक्कम रूपये 20,150/- वसूल करून पंचायत समिती उपकरात भरणा करून अनुपालन दर्शवावे.

5) लाभार्त्याने, पंचायत समितीने दिलेल्या लाभाचा दुर्विनियोग अथवा विक्री करू नये म्हणून त्यांचेकडून 100 रूपयाच्या बंधपत्रावर करारनामा करणे आवश्यक होते. परंतु पंचायत समितीने अशी उचित कार्यवाही केलेली नाही.

**4.517 दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत रद्द केलेल्या बांधकामाची रक्कम शासनखाती जमा न करणे व इतर अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती, उस्मानाबाद, सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात दलित वस्ती सुधार योजना मासिक प्रगती अहवाल व अभिलेखे तपासणी केली असता रद्द केलेल्या बांधकामाची रक्कम शासनखाती जमा न केल्याचे निदर्शनास आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत 45 कामे रद्द करण्यात आलेली आहेत. सदरच्या कामांची अखर्चीत रक्कम रुपये 1,65,50,000/- महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण1002/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/062008 प्रमाणे शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) सन 2010-2011 मध्ये ग्रामपंचायत शेकापूर रुपये 80,000/-, सन 2012-2013 मध्ये ग्रामपंचायत भिकारसारोळा रुपये 75,000/-, ग्रामपंचायत भंडारी रुपये 50,000/-, ग्रामपंचायत बेंबळी रुपये 50,000/- तसेच सन 2013-2014 मध्ये ग्रामपंचायत भिकार सारोळा रुपये 50,000/-, ग्रामपंचायत कोळेवाडी रुपये 50,000/- व ग्रामपंचायत देवळाली यांना रुपये 1,25,000/- अशी एकूण रक्कम रुपये 4,80,000/- अग्रीम स्वरुपात प्रदान केलेले आहे. सदर अग्रीमाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

3) दलित वस्ती सुधार योजना 3(तीन) कामे अद्याप सुरु झालेली नाहीत. सदरील कामासाठी प्राप्त रक्कम रुपये 11,00,000/- शासनखाती जमा करणे आवश्यक आहे.

4) सिमेंट रस्ता महार मांग वस्ती वडाळा कामाबाबत ग्रामपंचायत नांदूर्गा यांना प्रदान केलेली अग्रीम रक्कम रुपये 54,759/- वसुल करणे आवश्यक आहे.

5) सन 2012-2013 व सन 2013-2014 मधील 6 कामे अपूर्ण व प्रगतीत आहेत. सदरील अपूर्ण व प्रगतीमध्ये असलेली कामे पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा सदर कामासाठी प्राप्त रक्कम रुपये 33,00,000/- प्रदान रक्कमेसह वसुल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

6**)** सिमेंट रस्ता व नाली बांधकाम टाकळी बेंबळी सन 2012-2013 मधील काम आहे त्या स्थितीत अंतीम करण्यात आले त्यामूळे सदरील कामावर झालेला खर्च रककम रुपये 75,000/- निष्फळ ठरला आहे**.** निष्फळ खर्च रक्कम रुपये 75,000/- वसुल करणे आवश्यक आहे**.** तसेच उर्वरीत रक्कम रुपये 2,25,000/- अशी एकूण रक्कम रुपये 3,00,000/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे**.**

7) सन 2010-2011 मधील कामे पूर्ण झाल्यानंतर अखर्चीत असलेली रक्कम रुपये 21,568/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे**.**

8) पंचायत समितीने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 244 अन्वये नमुना नंबर 90 अनुदान नोंदवही ठेवलेली नाही**.** याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे**.**

**4.518 अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकांचा वस्ती विकास (दलित वस्ती सुधार योजना) या योजनेतंर्गत करण्यात आलेल्या विविध बांधकामातील शासकीय कपाती न केलेलबाबत.**

**पंचायत समिती उमरगा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती, उमरगाने सन 2014-2015 या वित्तीय वर्षात अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकांचा वस्ती विकास (दलित वस्ती सुधार योजना) या योजनेतंर्गत 14 कामे केली असून, त्यामध्ये आवश्यक असलेल्या शासकीय कपाती केलेल्या नाहीत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम 2002 (सन 2005 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 09) मधील कलम 16 नुसार व सार्वजनिक बांधकम विभाग, शासन निर्णय, क्रमांक - बीडीजी-2005/प्र.क्र.324/इमारती- 2, दिनांक 03/03/2006 नुसार तसेच विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई, दिनांक 04/04/2012 च्या अधिसूचनानुसार मुल्यवर्धीत करांची नोंदणी नसलेल्या ठेकेदारांकडून बांधकामाच्या देयकातून 5 टक्के मुल्यवर्धित कराची कपात न केलेली रक्कम रुपये 38,496/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) प्राप्तिकर अधिनियम 1961 मधील कलम 194 नुसार बांधकामाच्या मुल्यातून 2 टक्के प्राप्तिकर कपात करणे आवश्यक आहे. बांधकामांचे मुल्यांकनानुसार 2 टक्के प्रमाणे प्राप्तिकराची कमी कपात रक्कम रुपये 22,398/- संबंधित ठेकेदाराकडून वसुल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

3) इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती) अधिनिनियम 1996, इमारत व इतर बांधकाम कामगार उपकर अधिनियम 1996, इमारत व इतर बांधकाम उपकर नियम 1998 नुसार व तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) नियम 2007, दिनांक 05/02/2007 व महाराष्ट्र शासन,

उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्रमांक- बीसीए 2009/प्र.क्र.108/कामगार 7-अ, दिनांक 17/06/2010 मधील नियम 03 (1) नुसार बांधकामाचे मुल्यावर कमी कपात केलेली 1 टक्के उपकर रक्कम रुपये 3,699/- वसुल करणे आवश्यक आहे.

4) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक विमास-109/प्र.क्र.2/98/ शासन हमी,दिनांक 19/08/1998 नुसार कंत्राटदारास कंत्राटी कामापोटी देय रक्कम प्रदान करण्यापुर्वी कंत्राटदाराने कंत्राटी कामाचा विमा कंपनीकडे उतरविला असल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक असतांना, त्याप्रमाणे पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र दिनांक 02/06/2003 नुसार विमा रक्कम ठेकेदाराचे देयकातून कपात करुन शासकीय विमा खात्यात भरणे आवश्यक आहे. कामाचा विमा कमी कपात केलेली रक्कम रुपये 3,699/- संबंधित ठेकेदाराकडून वसुल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

5) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक - गौ.ख.नि.10/1009/ प्र.क्र.309/ ख,दिनांक 11/02/2010 नुसार बांधकामाचे देयकातून गौण खनिजाची रक्कम संबंधिताकडून वसुल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. कमी कपात केलेली रॉयल्टीची रक्कम रुपये 1,24,725/- संबंधित ठेकेदाराकडून वसुल करुन शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

**4.519 बांधकामाच्या देयकातून गौणखनिजाची रक्कम कमी कपात करणे, कामगार उपकर कपात न करणे.**

**पंचायत समिती लोहारा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती, लोहाराने दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत 14 बांधकामावर रुपये 27,25,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन अधिसुचना दिनांक 15/01/2006 व शासन निर्णय क्रमांक गौणखनिज/10.2.06/प्र.क्र.57/2/ब,दिनांक 15/02/2006 अन्वये गौणखनिज स्वामित्वधनाची परिगणना करुन कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांनी गौणखनिज रक्कम कपातीबाबत मोजमाप पुस्तिकेत नमूद केली पाहीजे. परंतु या प्रकारे कार्यवाही न करता व दर पृथ:करणातील दरानुसार वसुल न करता प्रोव्हायडींग या बाबीची गौणखनीज रक्कम कपात केली नाही, 12 कामामध्ये गौणखनिज रक्कम रुपये 66,713/- कमी कपात केली आहे. सबब रक्कम रुपये 66,713/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, अधिसुचना क्रमांक बीसीए-2008/ प्र.क्र.907/कामगार-7,दिनांक 16/04/2008 व शासन परिपत्रक, क्रमांक बीसीए-12007/प्र.क्र.788/ कामगार-7,दिनांक 21/04/2008 नुसार 1 टक्के दराने उपकर वसुल करण्यात यावे असे आदेश आहेत. तथापि याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही, एकूण 5 कामाची 1 टक्के दराने उपकर रक्कम रुपये 14,000/- वसुल करुन कामगार उपकर खाती भरणा होणे आवश्यक आहे.

**4.520 दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत कामातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती लोहारा, जिल्हा उस्मानाबाद, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 30) -** पंचायत समिती, लोहारा अंतर्गत 39 दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत कामावर रुपये 91,36,918/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन अधिसुचना दिनांक 15/01/2006 व शासन निर्णय क्रमांक गौणखनिज/10.2.06/प्र.क्र.57/2/ब,दिनांक 15/02/2006 अन्वये गौणखनिज स्वामित्वधनाची परिगणना करुन कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांनी गौणखनिज रक्कम कपातीबाबत मोजमाप पुस्तिकेत नमूद केली पाहीजे. परंतु या प्रकारे कार्यवाही न करता व दरपृथ:करणातील दरानुसार वसुल न करता गौणखनिज रक्कम रुपये 88,531/- कमी कपात केली आहे. सबब रक्कम रुपये 88,531/- वसुल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 168 अन्वये कार्यकारी अभियंता यांनी रुपये 50,000/- च्या प्रत्येक टप्प्यामध्ये कामाची 5 टक्के तपासणी करणे आवश्यक आहे तथापि, कार्यकारी अभियंता यांनी अशी तपासणी केलेली नाही. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार प्राप्त साहीत्याचा चाचणी अहवाल घेणे आवश्यक आहे. तथापि, अशी कार्यवाही न करता बांधकामाच्या देयकाचे अंतीम प्रदान केलेले आहे.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 20 अन्वये कंत्राटदाराने रक्कम प्राप्ती बाबत महसुल मुद्रांकीत पोच देणे आवश्यक असतांना अशी पोच घेण्यात आलेली नाहीत.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपर-2009/ प्र.क्र.180/परा-8,दिनांक 31/12/2009 नुसार प्रत्यक्ष कामाच्या जागी विहित प्रपत्रात कामाची माहीती दर्शविणारे फलक बसविणे आवश्यक आहे. तथापि, जिल्हा परिषदेने अंदाजपत्रकात सदर बाबीचा समावेश करुन कामाची माहीती दर्शविणारे फलक बसविले नाहीत.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.-44/38, दिनांक 22/12/2000 नुसार प्रत्येक कामासाठी स्वतंत्र मोजमाप पुस्तिका ठेवणे आवश्यक आहे. तथापि, पंचायत समितीने एकाच मोजमाप पुस्तिकेत वेगवेगळ्या कामाच्या नोंदी केलेल्या आहेत. याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

**4.521 काम अपूर्ण असल्याने झालेल्या निष्फळ खर्चाबाबत.**

**पंचायत समिती औसा, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, औसा. मध्ये दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत 39 कामे अपूर्ण असल्याने सदरील कामावर झालेला खर्च रुपये 43,45,969/- निष्फळ ठरलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदरील कामे लेखापरीक्षण वर्षाखेर 39 अपूर्ण आहेत. या कामांवर एकुण रुपये 43,45,969/- इतका खर्च नोंदविण्यात आलेला आहे. कामे विहीत वेळेत पुर्ण न केल्यामुळे शासनाकडुन प्राप्त निधी सदर कामांवर नाहक गुंतून रहातो व ग्रामीण भागातील जनतेस योजनेचा लाभ मिळत नाही. त्याच प्रमाणे कामावर खर्च वाढण्याची शक्यता असते व त्यामुळे शासन निधीवर त्याचा भार पडतो पर्यायाने शासन निधीचे नुकसान होते.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 95 (2) (ड) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या सर्व कामांचे व विकास योजनांचे कार्यान्वयन करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

3) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 1002/प्र.क्र.128/अर्थोपाय,दिनांक 06/06/2008 प्रमाणे एका आर्थिक वर्षामध्ये मुक्त केलेला निधी पुढील एका आर्थिक वर्षात वापरता येईल व त्यानंतर अखर्चीत साहिलेला निधी स्वायत्त संस्थानी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे. उपरोक्त सुरु नसलेल्या कामांची रक्कम रुपये 46,50,000/- अखर्चित राहिलेला आहे. तथापी पंचायत समितीने सदरील अखर्चित निधी शासन खाती भरणा केलेला नाही.

4) दहा कामे पूर्ण झालेली असून सदरील कामावर रक्कम रुपये 14,50,000/- चे प्रदान झालेले आहे. परंतु सदरील कामांचे अंतिम प्रदान करण्यात आलेले नाही. तरी या कामाचे अंतिम प्रदान करताना सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात यावी.

5) तसेच दोन कामे सुरु नसताना सदरील कामास रक्कम रुपये 2,00,000/- अग्रिम देण्यात आलेला आहे. तरी रक्कम रुपये 2,00,000/- वसूल करून शासन खाती भरणा करावी.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/ प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 चे परिच्छेद 2 जिल्हा परिषदांकडील हस्तांतरीत योजना (बांधकाम विभाग) योजनाबाबत परिशिष्ट क प्रमाणे वेळापत्रक विहीत करुन प्रत्येक टप्प्याची कार्यवाही पुर्ण करावे. तथापी सन 2012-13 व 2013-14 मधील प्राप्त अनुदाने कामावर पुर्णत: खर्च न झाल्याने व कामे अपुर्ण असल्याने शासनाच्या योजनांचा जनतेस

फायदा होऊ शकला नाही. तसेच कामे अपुर्ण राहिल्याने शासन निधी नाहक गुंतून पडला असुन निधीचा गैरव्यवहार, अपहार, इत्यादी होण्याची व कामाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

7) अर्धसमास पत्रान्वये दिनांक अन्वये अभिप्राय मागवूनही कोणतेही अभिप्राय देण्यात आले नाहीत.

**4.522 सायकल खरेदी व वाटपातील अनियमिततابाबत.**

**पंचायत समिती औसा, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वैयक्तिक लाभाच्या योजना राबविताना ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक ZPA/2008/प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्याचे वेळापत्रक ठरविण्यात आले असुन योजनेस प्रशासकीय व तांत्रिक मान्यता 30 जुनपर्यंत, लाभार्थी निवड 31 मे पर्यंत, निवीदा प्रक्रिया 31 ऑगस्टपर्यंत, पुर्ण करुन साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश देणे 30 सप्टेबरपर्यंत, लाभार्थ्यांना साहित्य वाटप 30 नोंव्हेबर पर्यंत, पुरवठादाराचे देयक अदा करणे 31 जानेवारीपर्यंत व विनियोगाचे दाखले मार्च अखेरपर्यंत प्राप्त करावयाचे आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) शासन दरकरार क्रमांक no-spc/rct/bicycle/12/2014-15/c-383 director of industries, दिनांक 21/01/2015 (वैधता कालावधी 21/01/2015 ते 30/06/2015) नुसार सायकल दर रुपये 3,096/- प्रती नग उपलब्ध असताना समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांनी मंजूर केलेल्या रुपये 3,278/- प्रती नग या निविदा दराप्रमाणे दर निश्चित करून साहित्याची खरेदी केलेली आहे. त्यामुळे 76 नग जादा दर रुपये 182/- प्रमाणे रुपये 13,832/- जादा प्रदान झाले आहे याबाबत संबंधीतावर जबाबदरी निश्चितकरून रक्कम वसूल करून पूर्तता दर्शवावी.

3) पंचायत समितीने स्वउत्पन्न मधून समाज कल्याण विभाग अंतर्गत मागासवर्गीय 3 टक्के अपंग महिलांना 100 टक्के अनुदानावर सायकल वाटपसाठी खरेदी केली आहे. एकूण 76 नग लक्ष्मी ट्रेडिंग कंपनी, बीड यांचेकडून समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांनी मंजूर केलेल्या निविदा दराप्रमाणे दर निश्चित करून साहित्याची खरेदी केलेली आहे. तसेच सदरील महिला अपंग असलेबाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र घेतले नाही. त्यामुळे सक्षम लाभार्थी निवड व उदेशानुसार योग्य कार्यवाही झालेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय दिनांक 20/10/1999 नुसार लाभार्थीची निवड ग्रामपातळीवर ग्रामसभेतून होणे आवश्यक होते. परंतू अशी निवड झाल्याची खात्री लेख्या अभावी करता आली नाही. योजनेचा लाभ देणेपुर्वी पात्र लाभधारकाची निवड होऊन त्या यादीस पंचायत समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक होते परंतु तशी कार्यवाही केलेली नाही.

5) एकाच लाभधारकास पुन्हा लाभ दिला जाणार नाही यासाठी पंचायत समिती स्तरावर लाभ देण्यात आलेल्या लाभधारकाची गाववार नोदवही ठेवणे आवश्यक आहे परतू अशी कार्यवाही कार्यालयाकडून न झाल्याचे दिसून येते.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2010/ 275/प्र.क्र.172/परा-7,दिनांक 19/10/2011 नुसार ज्या वस्तू / साहित्य व सेवा पुरवठ्यासाठी शासन दर करार नाहीत त्या प्रत्येक वस्तूची खरेदी करताना रुपये एक लक्ष पेक्षा जास्त रक्कमेची अशी कोणतीही खरेदी दिनांक 1 जानेवारी 2012 पासून इत्यादी -निविदा (e-Tendering) पद्धतीने करणे अनिवार्य करण्यात आले आहे. परंतू पंचायत समितीनी अशी कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2009/ प्र.क्र.514/वित्त-9,दिनांक 20/11/2009 अन्वये निविदेची रक्कम 10 लक्ष पर्यंत असेल तर रुपये 100/- व त्यापुढील प्रत्येक लाखासाठी रुपये 100/- व जास्तीत जास्त रुपये 5 लक्ष पर्यंत मुद्रांक शुल्क घेणे आवश्यक आहे त्यानुसार रुपये 100/- चे मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक होते, परंतु पंचायत समिती ने तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे शासकीय महसुलाचे नुकसान झाले आहे ते वसूल करणे आवश्यक आहे.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 108(1) मधील क्रमांक (1) (2) नुसार गटविकास अधिकारी यांनी विकास योजनांचा कृती आराखडा योग्यरित्या तयार करुन त्याची अमलबजावणी काटेकोरपणे पार पाडणे आवश्यक होते. तथापी सदर योजना राबविण्यात आली असताना कृती आराखडा ढोबळ स्वरुपाचा असल्याचे स्पष्ट होते.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 79 अन्वये तात्काळ संवितरणासाठी आवश्यक असल्याखेरीज रक्कम आहरण करता येत नाही तसेच जडसंग्रह नोंदवहीत नोंद घेणे आवश्यक आहे. साठा नोंदवहीत नोंद घेतल्याचे प्रमाणपत्र नसताना व साहित्य प्राप्त नसताना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 51 (3) मधील तरतुदीनुसार आहरण व प्रदान केलेले आहे.

10) प्रथम लाभार्थी निवड करून लोकवाटा जमा केल्यानंतर साहित्य खरेदी करणे आवश्यक असताना लोकवाटा जमा नसताना साहित्य खरेदी आदेश देण्यात आले आहेत.

11) साठा नोदवही पान क्रमांक 91,दिनांक 26/11/2015 अखेर पर्यंत 17 नग सायकल साठ नोदवहीमध्ये शिल्लक असल्याचे दिसून येते. यावरून आवश्यकता नसताना साहित्याची खरेदी केल्याचे दिसते.

**4.523 ग्रामीण भागातील मागासवर्गीय महिलांना शिवनयंत्र पुरविणेसाठी केलेल्या खरेदीतील अनियमितेबाबत.**

**पंचायत समिती रेणापूर, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती, रेणापूर. यांनी सन 2014-2015 या वित्तीय वर्षात खालील ग्रामीण भागातील मागासवर्गीय महिलांना शिलाई मशीन पुरवठा करणे बाबत रुपये 4,50,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन दरकरार क्रमांक एसपीसी/आरसीटी/Household Sewing Machine07/2014-2015/बी-2020,दिनांक 26/02/2015 अन्वये दरकरार उपलब्ध असताना दरकरारावर सदरील खरेदी न करता जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाने मागविलेल्या दराच्या आधारे दर निश्चित केले आहेत.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग उर्जा व 1992 तथा e-tender प्रमाणे कार्यवाही केली नाही. तसेच दरकरार उपलब्ध असले बाबत मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनाकडे विचारणा केली नाही.

3) महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/ 2512/उद्योग-6,दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद 8.3 (6) परिशिष्ठ-7 प्रमाणे जिल्हा परिषद स्तरावर निविदा मागवून पंचायत समिती स्तरावर त्याच दराने करावयाच्या खरेदी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पुर्नप्रत्ययी आदेश घेणे आवश्यक असताना असे आदेश घेतलेले नाही व सदर वस्तुच्या बाजारातील किंमतीत त्यामुळे आदेशापेक्षा कमी नसतील याची शहानिशा न करता शिलाई मशीनची खरेदी केली आहे.

4) पुरवठादार अधिकृत पुरवठादार असल्याची कागदपत्रे तसेच व्हॅट, टॅक्स क्लीयरन्स प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे संचिकेसोबत नाहीत. सदरील कागदपत्रे संचिकेत नसल्यामुळे पुरवठादार पात्र असल्याची खात्री करता आली नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे परिपत्रक क्रमांक पंरास-1020/ प्र.क्र.14/38,दिनांक 09/02/2001 अन्वये अंमलबजावणी परिणामकारक व्हावी यासाठी अर्ज छाननी करुन लाभार्थीची निवडही वास्तविक निविदा बोलविण्यापुर्वी होणे गरजेचे आहे. परंतु याप्रमाणे लाभार्थीची निवड केलेली नाही.

6) साहित्याचा पुरवठा मानकाप्रमाणे असल्याबाबत चाचणी अहवाल उपलब्ध केलेला नाही. पुरवठा आदेशातील अटी शर्ती नुसार कार्यवाही केलेली नाही.

7) संबंधित योजनाच्या नस्तीमध्ये लाभार्थी निवडीची यादी व त्याचे प्रस्ताव नाही. त्या मुळे प्राप्त व योग्य लाभार्थ्यांना लाभ दिल्याबाबतची खात्री पटली नाही.

8) लेखापरीक्षण दिनांकापावेतो साठा रजिस्टरमध्ये महिलांना वाटप व्हावयाचे 24 नग शिल्लक आहेत. 24 नगाची एकुण किंमत रुपये 3,440/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये 82,560/- रक्कम नाहक गुंतून पडली आहे. शिल्लकेबाबत व वाटप न करणेबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

9) डिलेव्हरी चलनावर संस्थेची अधिकृत स्वाक्षरी नसुन क्रमांक नमूद नाही. तसेच पुरवठादाराची रक्कम प्राप्तीची मुद्रांकीत दिनांकीत पोच पावती घेतलेली दिसून आली नाही.

10) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग क्रमांक भांखस/1093/प्र.क्र.1239/34,दिनांक 01/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार लाभार्थीचे गाव निहाय मास्टर रजिस्टर दर्शविले नाही. ते दर्शवून दुबार लाभ दिला नसल्याची खात्री पटवावी.

11) पुरवठा आदेश देणेपुर्वी अटी शर्तीसह रुपये 100/- च्या मुद्रांक पेपरवर करारनामा करुन घेणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही. रुपये 100/- ची वसूली होणे आवश्यक आहे.

12) लाभार्थीचे उपयोगिता प्रमाणपत्र घेतलेली नाहीत. तसेच ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक पंरास-1089/646/266/34, दिनांक 29/07/1989 नुसार योजनेचा फलश्रुती अहवाल सादर होणे आवश्यक असताना अहवाल सादर केल्याचे दिसून येत नाही.

### 4.524 समाज कल्याण पंचायत समिती उपकर योजने अंतर्गत ग्रामीण भागातील मागासवर्गीयासाठी लोखंडी पत्रे पुरवठा करणेतील अनियमितता.

**पंचायत समिती रेणापूर, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 24) -** पंचायत समिती रेणापूर, यांनी सन 2014-2015 या वित्तीय वर्षात उपरोक्त प्रमाणे समाज कल्याण पंचायत समिती उपकर योजने अंतर्गत ग्रामीण भागातील मागासवर्गीयासाठी लोखंडी पत्रे पुरवठा करणेबाबत रुपये 3,98,927/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार बांधकाम विषयक योजनांचे अंमलबजावणीचे वेळापत्रक ठरविण्यात आलेले असून निर्धारित वेळेनुसार प्रत्येक टप्प्याची कार्यवाही पूर्ण करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी प्रथमत: निश्चित करावी व त्याप्रमाणे अंमलबजावणीचे विविध टप्पे मुदतीमध्ये पूर्ण करावेत. त्यानुसार वार्षिक नियोजन आराखडा तयार करणे 30 एप्रिल पर्यंत, समिती / सभेची मान्यता 15 मे पर्यंत, कामांना प्रशासकीय, तांत्रिक मंजूरी प्रदान करणे जुन अखेर, कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करणे ऑगष्ट अखेर, कामाचे कार्यारंभ आदेश देणे 15 सप्टेंबर, कामाचे मार्क आऊट देवून काम सुरु करणे सप्टेंबर अखेरपर्यंत, पूर्णत्त्वाचे दाखले देवून अंतिम अदाई करणे जानेवारी अखेरपर्यंत, विनियोग दाखले घेणे 31 मार्च पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. परंतु पंचायत समितीने उपरोक्त शासन परिपत्रकातील वेळापत्रकाप्रमाणे कोणतीही कार्यवाही केलेली नाही व प्रत्येक बाब विलंबाने केलेली आहे.

2) पंचायत समिती रेणापूरने, पंचायत समिती चाकुर यांनी केलेल्या निविदा प्रक्रिया नुसार श्री शेतकी भांडार इंदिरा मार्केट, कळमनुरी यांना रक्कम रुपये 1,483/- प्रति नग प्रमाणे टिनपत्रे पुरवठा करण्याचे आदेश दिलेले आहेत. दुसऱ्या संस्थेने केलेल्यानिविदेवर पुरवठा आदेश देणेबाबत प्रधिकार दर्शवावा.

3) पंचायत समिती चाकूर, सन 2014-2015 चे लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक 14 नुसार निविदा प्रक्रियेत अनियमितता झालेली आहे. झालेल्या अनियमितते बाबत सविस्तर आक्षेप नोंदविला आहे. तसेच याबाबत वरिष्ठ लेखाधिकारी वित्त विभाग, लातूर व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांचे अध्यक्षते खाली चौकशी झालेली असून चौकशी अहवाल अनुक्रमे दिनांक 04/03/2015 व 19/06/2015 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना सादर केलेला आहे. तरी याबाबत चोकशी व्हावी.

4) खरेदी करावयाच्या वस्तूच्या किंमतीची खात्री बाजारभावाशी करणे आवश्यक होते. तसेच किंमत जास्त वाटल्यास मंजूर निविदादारास वाटाघाटीस बोलवून लोखंडी पत्र्याची किंमत कमी करणे आवश्यक होते. परंतु पंचायत समितीने अशी कार्यवाही केलेली नाही.

5) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2009/प्र.क्र.514/वित्त-9, दिनांक 20/11/2009 नुसार करारनाम्याची रक्कम जर 10 लाखापर्यंत असेल तर 100/- रुपये मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे. तसेच पुढील प्रत्येक 1 लाख रक्कमेसाठी रुपये 100/- मुद्रांक शुल्क रक्कम भरणे आवश्यक आहे. तरी पंचायत समितीने संबंधित पुरवठादारासोबत करारनामा केलेला नाही.

6) एकाच लाभधारकास पुन्हा लाभ दिला जाणार नाही यासाठी पंचायत समिती स्तरावर लाभ देण्यात आलेल्या लाभाधारकाची गाववार नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही कार्यालयाकडून न झाल्याचे दिसून येते.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 91 नुसार गट विकास अधिकारी, यांनी सहा महिन्यातून एक वेळी साठा नोदवहीनुसार साठा योग्य असल्याची तपासून खात्री करणे आवश्यक आहे. तसेच नियम 98 नुसार वर्षाखेर शिल्लक साठ्याची पडताळणी करून विहित प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे. परंतु तशी कार्यवाही गट विकास अधिकारी यांनी केलेली नाही.

8) लाभार्थी प्रस्ताव तपासणीसाठी न दर्शविलेमुळे योग्य लाभार्थीस लाभ मिळाल्याची खात्री करता आली नाही.

9) डिलेव्हरी चलन संचिकेत नाही, त्यामुळे साहित्य केव्हा प्राप्त झाले याची खात्री करता आली नाही. तसेच साठा नोंदवही पहावयास मिळाली नाही.

**4.525 ग्रामीण भागातील शिवणकला प्रशिक्षीत मागासवर्गीय महिलांना 100 टक्के अनुदानवर पिकोफॉल मशिन यंत्र वाटपाबाबत.**

**पंचायत समिती शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** सन 2014-2015 या वित्तीय वर्षात 100 टक्के अनुदानावर शिवणकला प्रशिक्षित मागासवर्गीय महिलांना पिको फॉल मशीन दरकरारा वर खरेदी करून विलंबाने वाटप करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 9-2008/प्र.क्र.446/वित्त-3 मुंबई, दिनांक 20/06/2008 नुसार लाभार्थ्यांची निवड 31 मे अखेर पर्यंत व समितीची मान्यता 31 ऑगस्ट पर्यंत घेणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाल्याबाबतची कागदपत्रे लेखा परिक्षणात पहावयास मिळाली नाहीत.

2) ग्रामविकास विभाग परिपत्रक क्रमांक मागास/1089/प्र.क्र.55 दिनांक 05/10/1989 नुसार योजनेवरील लाभार्थ्याची गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही न ठेवल्याने लाभार्थीनी इतर विभागाकडुन राबविण्यात आलेल्या याच योजनेतुन यापुर्वी लाभ दिला गेला नाही हे तपासता आले नाही त्यामुळे मास्टर नोंदवही आधारे असा दुबार लाभ दिला गेला नाही हे दर्शवावे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 91 नुसार गट विकास अधिकारी यांनी सहा महिन्यातून एकवेळा साठा नोंदवही नुसार साठा योग्य असल्याची तपासून खात्री करणे आवश्यक आहे.तसेच नियम 98 नुसार वर्षा अखेर शिल्लक साठ्याची पडताळणी करून विहित प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक आहे परंतु तशी कार्यवाही गट विकास अधिकारी यांनी केलेली नाही .

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83 (3) नुसार प्रत्यक्ष साहित्य खरेदी करण्यापूर्वी गुणवत्ता व योग्यते बाबतचे प्रमाणपत्र दिलेले नाही त्यामुळे गुणवते बाबत खात्री करता आली नाही.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी-1083/67,दिनांक 02/07/1993 नुसार लाभार्थ्याकडून विनियोग प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे तसेच सक्षम अधिकाऱ्याची फलश्रुती अहवाल घेणे आवश्यक आहे. परंतु याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. तसेच गटविकास अधिकारी यांनी लाभ दिल्यानंतर चाचणी तपासणी केलेली नाही. दिनांक 31/03/2015 रोजी साठा नोंदवही नमुना नंबर 33 पृष्ठ क्रमांक 33 वर 36 नग पिकोफाल मशीन प्राप्त असताना 20 नगाचे वाटप पुढील आर्थिक वर्षात वाटप केलेले आहे. शिल्लक नग 16 एवढे लेखा परीक्षण दिनांका पर्यंत वाटप करण्यात आलेले नाही.

**4.526 दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत केलेल्या कामातील नियमबाहयतेबाबत.**

**पंचायत समिती देवणी, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत 15 कामासाठी रुपये 37,80,194/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) संचालक, समाज कल्याण विभाग, पुणे यांचे परिपत्रक, दिनांक 20/08/2001 मधील अटीनुसार पहिला हप्ता 40 टक्के काम सुरु करण्यासाठी दिल्यानंतर व पहिला हप्त्याची रक्कमांची कामे पुर्ण होऊन त्यांचे मोजमाप घेऊन झाल्यानंतर तसेच सदर बांधकाम दलित वस्तीतच करण्यात आल्याचे गट विकास अधिकारी, यांनी प्रमाणित केल्यानंतर दुसरा हप्ता 40 टक्के रक्कम ग्रामपंचायतीना प्रदान करावयाचा असताना तसे करण्यात आलेले नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 146 नुसार करारनाम्यामध्ये नमुद अटीमध्ये कामाची मुदत नमुद केली नसून करारनामा स्विकृत केल्याबाबत गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. दोन पार्टीत करारनामा झाला नसताना अग्रिम रक्कमा प्रदाना बाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 चे नियम (अ) (3) नुसार घेतलेली मोजमापे कोणत्या तारखेस घेतली याची मोजमाप पुस्तिकेत तारीख नमुद नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार काही कामामध्ये सिमेंट, स्टिल इत्यादी साहीत्याचा चाचणी अहवाल नसल्यामुळे साहीत्य योग्य गुणवत्तेचे दर्जाचे वापरले बाबतची पडताळणी करता आली नाही.

5) सदर कामाचे संदर्भात ग्रामपंचातीला अग्रीम रक्कम देऊनही सदर बांधकामे अपूर्ण असून ग्रामपंचायतीने केलेल्या कामाचे मोजमापे घेण्यात आल्याचे आढळून आले नाही. दलित वस्ती योजना अंतर्गत कामे पुर्ण करण्यासाठी एक वर्षाची मुदत असल्याने त्या मुदतीत कामे पुर्ण करुन लेखासंहिता 1968 चे नियम 190 नुसार नमुना नंबर 65 मध्ये काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

6) नकाशे / आराखडयावर सरपंच / सचिव स्वाक्ष-या नाहीत.

7) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2004/ प्र.क्र.18/वित्त-9(33),दिनांक 30/06/2004 अन्वये रुपये 10.00 लाखापर्यतची काम ग्रामपंचायतीना देताना सदर ग्रामपंचायती आर्थिक दृष्टया सक्षम असल्याची खात्री करणे आवश्यक आहे.

8) ग्रामपंचायतीने बांधकामासाठी साहीत्याची खरेदी करुन वापरले असल्याबाबत खरेदीची देयके जोडलेले नाहीत.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 197 नुसार पुर्ण झालेल्या कामाची नोंद नमुना नंबर 69 मध्ये घेतल्याचे दिसून आले नाही.

10) आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 सी कंत्राटदाराच्या देयकातुन 2 टक्के आयकर कपात करण्याबाबत स्पष्ट तरतुद आहे. सदर काम ग्रामपंचायतीना कंत्राटदार म्हणून देण्यात आले आहे. सदर सर्व कामातुन 2 टक्के प्रमाणे आयकराची एकूण रक्कम रुपये 66,609/- वसूल करुन शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

11) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग-3 स्थाविका/2003/प्र.क्र.369/का का/1445,दिनांक 28/11/2003 अन्वये माहिती फलकाशिवाय अंतिम देयके अदा केलेले आहे. सदरच्या रक्कमेबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

12) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 151 (1) नुसार अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे आवश्यक आहे. अंदाजपत्रकाप्रमाणे कामे केलेले नसून एका बाबीची बचत दुस-या बाबीवर करण्यात आलेली आहे. नियम 153 (2) प्रमाणे सक्षम प्राधिका-याची मान्यता घेतलेली नाही ती घेऊन दर्शवावी.

13) अनुक्रमांक 14 ते 15 प्रमाणक क्रमांक 345 व 358 या कामाची मोजमाप पुस्तिका व संचिका अर्धसमास पत्र क्रमांक 4, दिनांक 29/08/2016 अन्वये मागणी करुनही लेखापरीक्षणात उपलब्ध न केल्यामुळे कामाच्या मुल्यांकनाची खात्री पडताळता आली नाही.